# Dr. Madhukarrao Wasnik

# PWS Arts and Commerce College

**Kamptee Road, Nagpur-26**

## Bibliometrics of the Publication During the year 2017-2018

| S.No | Title of the Paper | Name of the Author | Title of the Journal | Year of the Publication | Citation Index | Institutional Affiliation as mentioned in the Publication | Number of Citations excluding self-citations |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **1** | Striyanche Kaiwari Dr. Babasaheb Abmedkar | Ms. Pranoti Kamble | **Perspectives**<br>A National Peer Reviewed Interdisciplinary Research Journal<br>Vol-1 Issue- VII<br>ISSN: 2249 - 5134 | Aug- 2017 | **-** | Dr.M.W.P.W.S. Arts & Commerce College, Nagpur | **-** |

## Bibliometrics of the Publication During the year 2019-20

| Sr. No. | Title of the Paper | Name of the Author | Title of the Journal | Year of the Publication | Citation Index | Institutional Affiliation as mentioned in the Publication | Number of Citations excluding self-citations |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **2** | Baudhha Dharmacha Dakshinpurva Ashia V Japan Madhil Prasar Dai sampradayachya Sandarbhat Ek Vishleshnatmak Abhyas | Ms. Pranoti Kamble | Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ) | Feb-2020 | | | |

## Bibliometrics of the Publication During the year 2020-2021

| Sr. No. | Title of the Paper | Name of the Author | Title of the Journal | Year of the Publication | Citation Index | Institutional Affiliation as mentioned in the Publication | Number of Citations excluding self-citations |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Tripitkat Theri Gathetil Bhikkhu Vinay | Ms. Pranoti Kamble | Printing Area International Interdisciplinary Research Journal | Jan- 2021 | | | |

## Bibliometrics of the Publication During the year 2021-2022

| Sr. No. | Title of the Paper | Name of the Author | Title of the Journal | Year of the Publication | Citation Index | Institutional Affiliation as mentioned in the Publication | Number of Citations excluding self-citations |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Japan Madhe Bauddh Dharmacha Uday Ani Vikas | Dr. Pranoti Kamble | Research journey international E-Research journal Peer Reviewed, Vol-8 Issue-III, July- Sept 2021<br>E-ISSN:2348-7143 | July-Sep 2021 | - | - | - |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | Bhagwan Buddhanche Pali Sahityatil Arthik Vichar | Dr. Pranoti Kamble | Perspective a national inter disciplinary annual research journal | Oct-Dec 2021 | - | - | - |

**Principal**

**Dr. Yeshwant Patil**

2017 - 18

ISSN - 2249-5134

# Perspectives

A National Interdisciplinary Annual Research journal
2017

Peer Reviewed
Research Journal for
Interdisciplinary
Studies in Arts,
Commerce &
Social Sciences

Vol. I Issue-VII
August-2017

Dr. Madhukarrao Wasnik
PWS Arts and Commerce College
Kamptee Road, Nagpur-26
(Reaccreditated 'B' by NAAC)

Scanned with CamScanner

**मराठी विभाग-**


| | | | |
|---|---|---|---|
| 15. | भारतातील अन्नसुरक्षा : स्वरुप व उपाय | प्रा. डॉ. प्रज्ञा बागडे | 45 |
| 16. | इतिहासलेखनशास्त्र म्हणजे काय ? | प्रा.डॉ.महेंद्र गायकवाड | 70 |
| 17. | फालुन दाफा : शरीर आणि मन यांच्या विकासाकरिता एक प्राचीन प्रभावी उच्च स्तरावरील साधना अभ्यास | डॉ. यशोधरा हाडके | 74 |
| 18. | पंचशीलाचा जागतिक समाज जीवनावर पडलेला प्रभाव : एक अध्ययन | डॉ. कैलाष फुलमाळी | 79 |
| 19. | विदर्भातील अस्पृश्योध्दार आंदोलनात नानासाहेब गवई यांचे योगदान | डॉ. राजु भा. खरडे | 82 |
| 20. | लोकशिक्षणात राजकीय पक्षाची भूमिका" | डॉ. विमल राठोड | 85 |
| 21. | बाबू आवळे यांचे वृत्तपत्रीय लेखन | डॉ. चंद्रशेखर पाटील | 87 |
| 22. | स्त्री आत्मचरित्रात 'आयदान' चे वेगळेपण | प्रा.अमृता डोरलीकर | 91 |
| 23. | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा विद्यार्थ्यांस संदेश | डॉ. निलीमा चौव्हान | 95 |
| 24. | स्त्रियांचे कैवारी डॉ. भिमराव रामजी आंबेडकर | प्रा. प्रणोती कांबळे | 98 |
| 25. | आधुनिक कृषी व भारतीय कृषी विकासातील प्रमुख योजना व संकल्पना | प्रा. मुरलीधर एस. नाकाडे | 100 |
| 26. | नोकरदारांच्या नुकसान भरपाईचा कायदा 1923 (The Employee's Compensation Act, 1923) | प्रा. विजय जा. पाठक | 103 |
| 27. | समाज प्रबोधक – संत तुकाराम | प्रा. डॉ. राम चौधरी | 106 |
| 28. | डॉ. आंबेडकरांची धम्मदिक्षा एक ऐतिहासीक पर्व | डॉ. रत्नपाल एम. डोहणे | 110 |
| 29. | नोटबंदीचे परिणाम | प्रा. एम. यू. टिपले | 112 |
| 30. | मराठी पौराणिक कादंबरीतील मिथके आणि नवीनता | डॉ. भारती खापेकर | 116 |


Scanned with CamScanner

# स्त्रियांचे कैवारी डॉ. भिमराव रामजी आंबेडकर

**प्रा. प्रणोती कांबळे**

**सारांश :** नदीच्या प्रवाहात वळवणाऱ्या भक्कम खडकासारखे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जागतिक दर्जाचे भारतीय अर्थशास्त्रज्ञ कायदेपंडीत, समाजशास्त्रज्ञ, मानववंशशास्त्रज्ञ, इतिहासकार, शिक्षणतज्ञ धर्मशास्त्र तत्वज्ञ, लेखक, प्राध्यापक, समाजसुधारक, बॅरिस्टर वकील, पत्रकार, जलतज्ञ, संपादक, स्वातंत्र्य सेनानी, संसदपटू, स्त्रियांचे कैवारी, मजूरमंत्री, मानवी हक्कांचे कैवारी आणि बौद्ध धर्म पुनरुत्थानक होते. शिवाय ते भारत देशातील कोटयावधी शोषित पददलितांचे उद्धारक, स्वतंत्र्य भारताचे पहिले कायदामंत्री आणि स्वतंत्र्य भारतीय संविधानाचे शिल्पकार होते. ते बाबासाहेब या नावाने प्रसिद्ध आहेत. बाबासाहेबांच्या हयातीतच त्यांचे अनुयायी त्यांना बाबासाहेब म्हणत असत. बाबासाहेबाचा अर्थ पिता किंवा 'वडील' असा आहे नंतरच्या काळात हेच नाव रूढ झाले. आणि त्यांचे विरोधकही त्यांना बाबासाहेब संबोधू लागले. तसेच आज संपूर्ण विश्व त्यांना बाबासाहेब संबोधीत आहे.

**शब्दसंकेत :** स्त्रिया, कैवारी, शिक्षण, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, मुक्ती, सामाजिक

**प्रस्तावना :** स्वतंत्र भारतीय लोकशाही विषयी चिंतन करतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, की जोपर्यंत इंग्रज सरकार होते. तोपर्यंत देशातील चांगल्या वाईट गोष्टींची जबाबदारी आपण त्यांच्यावर टाकत होतो. पण आता आपण स्वतंत्र्य झाल्यामुळे चांगल्या वाईट गोष्टींची जबाबदारी आपलीच राहणार आहे. त्यामुळे आपल्याला आता अधिक जबाबदारीने वागावे लागणार आहे. देशाच्या सुरक्षिततेच्या संदर्भात डॉ. बाबासाहेब म्हणतात, भारताचे स्वातंत्र्य आपल्याच लोकांच्या विश्वासघाताने गेले आहे. आपल्याच लोकांनी देशद्रोह केला आणि भारत देश दुसऱ्यांच्या हाती दिला.

महमंद बीन कासिमने जेव्हा सिंधवर जेव्हा स्वारी केली तेव्हा राजा दाहीरच्या सेनापतीने लाच घेतली आणि तो आपल्या राजाच्या मदतीला धावला नाही त्यामुळे राजा दाहीरचा पराभव झाला. महमंद घोरीला भारतावर स्वारी करण्याचे आमंत्रण राजा जयचंदने दिले. शिवाजी महाराज स्वराज्यासाठी लढत होते. तेव्हा इतर मराठे सरदार शिवाजी महाराजांविरूद्ध लढत राहिले. आता पुन्हा तसेच होणार नाही ना? अशी त्यांना चिंता वाटत असे जर नेत्यांनी आपल्या पक्षाचे मत राष्ट्र हितापेक्षा श्रेष्ठ मानले तर भारताचे स्वातंत्र्य पुन्हा धोक्यात येईल. असे झाले तर पुन्हा स्वातंत्र्य मिळवणे अशक्य होवून बसेल. यासाठी रक्ताच्या शेवटच्या थेंबापर्यंत आपण आपल्या स्वातंत्र्यासाठी लढले पाहिजे. मी हिंदू, मी मुसलमान, मी ख्रिश्चन, मी शिख, मी जैन, मी बौद्ध यांना दुय्यम स्थान देवून मी प्रथम भारतीय व अंतर्गतःही भारतीयच आहे असे आपण मानलेच पाहिजे डॉ. बाबासाहेबांच्या या विचारांच्या शब्दाशब्दात राष्ट्रप्रेम ठासून भरले आहे. त्यामुळे ते केवळ दलितांचे किंवा संविधानाचे निर्माते नसून ते आधुनिक भारताचे प्रमुख निर्माते होते.

म्हणूनच नेल्सन मंडेला यांनी असे म्हटले आहे की, डॉ. आंबेडकरांचे संविधान आणि जातीनिर्मूलनवादी लेख नही आमची ऊर्जा आहे. आम्ही डॉ. आंबेडकरांच्या जीवन आणि कार्यापासून प्रेरणा घेवून आमचा संघर्ष सुद्धा त्याच आधारावर चालणार ज्या आधारावर आंबेडकरांनी समाज परिवर्तनाचा प्रयत्न केला आणि यश मिळविले.

**स्त्रियांचे कैवारी :** डॉ. बाबासाहेबांच्या त्या समाजाची प्रगती होण्यासाठी शिक्षणाचा प्रसार व्हायला हवा असे त्यांचे ठाम मत होते. कोणत्याही समाजाचे मुल्यमापन त्या समाजातल्या स्त्रियांची परिस्थिती कशी आहे. यावरून करता येते. समाजाने स्त्रियांच्या विकासाकडे लक्ष केंद्रित करणे आवश्यक असण्याची त्यांची आग्रहाची भूमिका होती.

डॉ. बाबासाहेब स्त्रीमुक्तीचे कट्टर समर्थक होते. त्यांच्यावर तथागत गौतम बुद्धाच्या शिकवणुकीचा आणि महात्मा जोतिबा फुलेंच्या कार्याचा प्रचंड प्रभाव होता. बाबासाहेबांच्या मते, बुद्ध हेच स्त्री स्वातंत्र्याचे आद्य पुरस्कर्ते होते. बुद्धांनी समानतेचा उपदेश दिला आणि तो आमलातही आणला. स्त्रियांना धम्मदीक्षेचा अधिकार देणारा बुद्ध धम्म हा मानवी इतिहासातला पहिला धर्म होय. जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या आणि अभ्यासक डॉ. रूपा कुलकर्णी – बोधी यांच्या मते, भारतीय स्त्रिमुक्तीची खरी वैचारिक बैठक भगवान बुद्धाच्या भक्कम अशा समतावादी तत्वज्ञानाच्या पायावर उभी आहे. बाहेरून आयात केलेल्या एखाद्या जेंडर बेस्ड विचारावर नाही. आणि कायदा एवढेच बाबासाहेबांचे महत्वाचे योगदान म्हणजे त्यांनी दिलेली ही शुद्ध भारतीय बैठक ही समाजाची समग्र प्रगती केवळ पुरूषांचीच नव्हे तर स्त्रियांची देखील होणे गरजेचे आहे. हे भान त्यांना विद्यार्थी दशेतच आले होते. ते स्त्री शिक्षणाचे कट्टर पुरस्कर्ते होते. प्रत्येकाने

Scanned with CamScanner

आपल्या घरातल्या मुलीला शिक्षणाची संधी दिली तर हा विचार समाजात सर्वत्र पसरेल. समाजाची प्रगती होण्यासाठी शिक्षणाचा प्रसार व्हायला पाहिजे. असे त्यांचे ठाम मत होते. शिक्षणामुळे मुले बिघडतात, हा विचार सगळयांनी मनातून काढून टाकायला पाहिजे. आई–वडीलांनी बाळपणापासुनच मुलाच्या शिक्षणाकडे लक्ष दिले पाहिजे, ब्राम्हणांच्या मुली जितक्या शिकतील तितक्याच दलितांमधल्या मुली शिकल्या पाहिजेत असे विचार त्यांनी वेळोवेळी मांडले. ते केवळ विचार मांडून थांबले नाही तर औरंगाबादला त्यांनी महाविद्यालयाची स्थापना केली आणि तेथे मुलींनाही प्रवेश दिला.

भारतीय समाज व्यवस्थेत घट्ट रूजेलेली विषमता नष्ट करण्यासाठी झटणाऱ्या बाबासाहेबांना स्त्रीयांवर होणारे अन्याय–अत्याचार अस्वस्थ करत होते. ही परिस्थिती बदलण्याचे एकमेव प्रभावी साधन म्हणजे शिक्षण यावर त्यांचा ठाम विश्वास होता. हा विचार समाजात रूजविण्यासाठी त्यांनी आपल्या लेखातून व्याख्यानातून पोटतिडकीने मांडणी केली. स्वतंत्र भारताचे पहिले मजूर मंत्री म्हणून बाबासाहेबांनी स्त्रीयांच्या सक्षमीकरणाचे अनेक निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी केली. खाण कामगार स्त्रीला प्रसूती भत्ता, कोळसाखाणीत काम करणाऱ्या स्त्री कामगारांना पुरूषाइतकीच मजुरी बहुपत्नीत्वाच्या प्रथेला पायबंद, मजूर व कष्टकरी स्त्रियांसाठी २१ दिवसांची किरकोळ रजा, दुखापत झाल्यास नुकसान भरपाई, २० वर्षाची सेवा झाल्यावर निवृत्तीवेतनाची तरतूद वगैरे अशा अनेक बाबींना कॉंग्रेसमधल्या सनातनी मंडळींचा टोकाचा विरोध होता. बाबासाहेबांना याचा खुप मनस्ताप झाला. शेवटी अनेक मुद्यासह ह्या प्रमुख मुद्यावरून त्यांनी आपल्या मंत्रीपदाचा त्याग केला. त्यांच्या मते, कोड बिलाचे काम संविधान निर्मिती एवढेच महत्वाचे होते.

**निष्कर्ष** : स्त्रियांनी आपले हक्क मिळविण्यासाठी पुढे यायला हवे हा विचार आंबेडकरांनी मांडला, बाबासाहेबांचे भारतीय स्त्रियांवर अनंत उपकार आहेत. त्यासाठी ती बाबासाहेबांची सदैव ऋणी असायला हवी. पण दुर्दैवाने उच्चभ्रु आणि बहुजन समाजातल्या स्त्रिया बाबासाहेबांच्या या कार्याविषयी अनभिज्ञ आहेत. की याबाबत जाणून घ्यायला तयार नाहीत. सांगणे कठिण वाटते काही अभ्यासक व चळवळीतल्या उच्चवर्णिय आणि दलित स्त्रियांनीच बाबासाहेबांना केवळ दलित स्त्रियांनीच बाबासाहेबांच्या योगदानाची दखल घेतली असल्याचे दिसून येते. बाबासाहेबांनी केवळ दलित स्त्रियांचा विचार केलेला नसून समस्त स्त्रीवर्गाचे प्रश्न ऐरणीवर आणले पण तरीही त्यांच्या क्रांतिकारी कार्याची उपेक्षा भारतीय स्त्रियांनी करावा हा करंटेपणाच आहे. हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून साधन उच्चभ्रू स्त्रियांचेच कल्याण होणार होते. हिंदू कोडबिलात सुचविलेल्या उपाययोजना पुढे कायद्याच्या रूपाने अमलात आल्या, त्याचा लाभ, दलित बहुजन स्त्रियांपेक्षा उच्चवर्णिय स्त्रियांनीच अधिक प्रमाणात झाला. येत्या काळात बाबासाहेबांनी स्त्रियांसाठी केलेल्या अद्वितिय कामगिरीची दखल नव्या पिढीतल्या, पुरोगामी, समतावादी उच्चभ्रू व बहुजन समाजातल्या स्त्रिया घेतील, अशी आशा करूया.

**संदर्भ**


१. आंबेडकर भिमराव (१९९४):'हिन्दू धर्म की रिडल्ज', समता प्रकाशन.
२. किर धनंजय (१९८९): 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
३. पाटील किर्ती (२००५): 'बौद्धधम्म जिज्ञासा', विकास पाटील प्रकाशित, वर्धा.
४. लोकराज्य (२००६): 'धम्मचक्र प्रवर्तन सुवर्ण महोत्सव' ऑक्टोबर २००६.
५. आंबेडकर भिमराव (२००१): 'भगवान बुद्ध आणि त्याचा धम्म', सुगत प्रकाशन, नागपूर.
६. खरात शंकरराव 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार, इंद्रायनी साहित्य प्रकाशक पुणे.



**प्रा. प्रणोती कांबळे**
पाली आणि प्राकृत विभाग प्रमुख
डॉ.म.वा.पी. डब्ल्यू. एस. कॉलेज, कामठी रोड नागपूर




Scanned with CamScanner

Peer Reviewed Referred and UGC Listed Journal

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume-VII, Issue-IV
October - December - 2018
Pali

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

Scanned with CamScanner

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VIII Issue - I Pali October - December - 2018

Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal
Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| 13 | The Tradition of Council and Present Situation of Dhamma<br>**Pallavi Samadhan Khanderao**<br>**Dr. Balaji Gavhale** | 82-86 |
| 14 | Living in Harmonay when thing far Apart<br>**Dr. Ashok Baladhan Ukey** | 87-92 |
| 15 | Metta Bhavan Destroy the all Akushala Dhamma into the Human Being<br>**Rahul Murlidhar Kamble**<br>**Dr. Mohan Wankhade** | 93-97 |
| 16 | A Critical & Comparative Analysis of Vijñānabhairava Tantra<br>**Rohit Sharma** | 98-102 |
| १७ | पालि साहित्य आणि बुद्धकालीन सामाजिक स्थिती<br>**प्रगती दुपारे**<br>**डॉ. कला वासनिक** | १०३-१०६ |
| १८ | आशियातील बौद्ध संस्कृती<br>**प्रा. प्रणोती सु. कांवळे** | १०७-१०९ |
| १९ | विश्व संस्कृतिपर बौद्ध कला और संस्कृति का प्रभाव - एक अध्ययन<br>**डॉ. समाधान कुंडलिक वाघमारे** | ११०-११६ |
| २० | माहिती तंत्रज्ञान आणि बौद्ध साहित्यातील शिक्षण पद्धती<br>**प्रा. सारिका विष्णु केदार** | ११७-१२१ |
| २१ | पालिसाहित्यातील बुद्धाला अभिप्रेत असलेले भौगोलिक पर्यावरण<br>**प्रा. स्निग्धा सादाफळे** | १२२-१२५ |
| २२ | बुद्धकालीन ऐतिहासीक व भौगोलिक परिस्थिती<br>**डॉ. मधुकर यादवराव कठाणे** | १२६-१३७ |
| २३- | बुद्धकालीन दान महोत्सवाची आवश्यकता<br>**राहूल तुकाराम मेश्राम** | १३८-१४१ |


Scanned with CamScanner

VOLUME - VII, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# १८. आशियातील बौद्ध संस्कृती

**प्रा. प्रणोती सु. कांबळे**
पाली आणि प्राकृत विभाग प्रमुख, डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यु. एस. महाविद्यालय, नागपूर.

बहुजनांच्या हितासाठी आणि सुखासाठी कल्याणकारी धम्माचा प्रसार दोन हजार पाचशे पन्नास वर्षापूर्वी भगवान बुद्धांनी भिक्खूंना दिला होता. अशा तऱ्हेचा धर्माचा प्रसार करणारा जगातील पहिला धर्म म्हणजे बुद्ध धम्म होय. संपूर्ण आशिया खंडात बुद्ध धम्माचा फार झपाट्याने प्रसार झाला. भगवान बुद्धाचे व्यक्तिमत्वच असे होती की, सर्वजण त्यांच्याकडे आकर्षित होत असत. तथगतांनी सांगितलेला धम्म हा आपल्याला मध्यम मार्गाची शिकवण देत असतो, त्यामुळे लोकांना ते स्वीकारावेसे वाटते. कारण त्यांनी जो निर्माण केलेला संघ आहे ते विनयशिल असल्यामुळे लोकांवर त्यांचा सहजच प्रभाव असे. या व्यतिरिक्त आणखी असे काही कारण आहेत की, त्यामुळे धम्माचा प्रसार झपाट्याने होते. ते म्हणजे बुद्ध धम्म स्वीकारणे अगदी सोपे होते.

धम्मात जात–पात न पाहता कोणालाही कसलाही भेदभाव न करता प्रवेश मिळत असे. आशिया खंडातील जवळ जवळ सर्वच देशांत बुद्ध धम्माला राजाश्रय मिळाला. सर्वत्र बुद्ध धम्माचा प्रसार होण्याचे मुख्य कारण म्हणजे लोकांच्याच भाषेत बुद्ध धम्म लोकांना सांगितला गेला आणि असाच आदेश भगवान बुद्धांचा होता.

अलीकडे मोठ्या प्रमाणात युरोप, अमेरिका येथील लोक बुद्ध धम्माकडे आकर्षित होत आहेत. याचे प्रमुख तीन कारणे आहेत.

1. बुद्ध धम्माचा विज्ञानवादी दृष्टीकोन.
2. धम्माची सहिष्णुतता बुद्धांच्या दोन हजार पाचशे पेक्षा जास्त वर्षांच्या काळाच्या इतिहासात कधीही कोणाचाही छळ केला गेला नाही. आणि धर्मांतर करण्यासाठी कधीच कोणाचीही फसवणूक केली नाही किंवा बळजबरी केली नाही.
3. महत्वाचे म्हणजे धम्मात व्यक्तींच्या विकासासाठी संपूर्ण स्वातंत्र्य दिले जाते.[1]

या वरिल कारणांमुळे युरोप, अमेरिकेतील सुज्ञ माणसे बुद्ध धम्माकडे मोठ्या प्रमाणात आकर्षित होत आहेत. तसेच थाईलंड, इंडोनेशिया, तिबेट, चीन, मंगोलीया, कोरिया – इ. सनाच्या 372 साली कोरियामध्ये चीनमधून बौद्ध धम्माचा प्रवेश झाला. कोरियात आलेल्या बौद्ध धम्म महायानी पंथातील उच्चकोटीचा बौद्ध धम्म होता असे मानले जाते. तेव्हा पासून कोरियाची संस्कृती बौद्ध धम्माचा मूळ पायावर वाढले आहे. कोरियाचे राजेयोद्धा बौद्ध धम्माचा तत्वज्ञानाप्रमाणे राज्य करत असत.[2] असं म्हटले जाते की, मुकुच्या बौद्ध भिक्षूने कोरियाच्या राजकुमारीला आजारातून मुक्त केले, तेव्हापासून कोरियन राजाने बौद्ध धम्माला राजधर्माची मान्यता दिली. या काळापासून बौद्ध धम्म हा कोरियाचा राष्ट्रधर्म बनला. बौद्ध धम्म वाढीसाठी किंवा यशस्वीतेसाठी कारण कुठलेही असो बौद्ध धम्माचे तत्वज्ञान जनसामान्य माणसाला रूचणारे आणि पचणारे आहे. माणसाच्या विकासाच्या आणि समृद्धीचा बुद्धाने सांगितलेला तो

एक मध्यम मार्ग आहे. म्हणूनच आज आणि तत्कालीन काळातही हा धर्म झपाट्याने वाढल्याचे दाखले सापडतात. म्हणूनच अनेक राष्ट्रांमध्ये तो राजधर्मही झालेला आहे.

जपान :– हा जगातील बौद्ध धम्माचा प्रभाव विशद करत असतांना बौद्ध धम्म आणि तत्वज्ञानाचा प्रभाव जपानमध्ये पडलेला दिसतो. भगवान बुद्धाच्या महापरिनिर्वाणानंतर साधारणपणे 1000 वर्षानंतर कोरियातून जपानमध्ये बौद्ध धम्माचा प्रसार झाला. जपानच्या सम्राटाच्या आज्ञेवरून इ.स. 720 मध्ये (निऊनकोषी) नावाच्या एका ऐतिहासिक ग्रंथात एका शिष्टमंडळाच्या ठरलेल्या करारानुसार सोन्याचा मुलामा दिलेली ब्रांझ धातूची मूर्ती, छत्र आणि बौद्ध धर्माचे अनेक ग्रंथ पाठविले. जपानच्या राज्याला एका पत्राद्वारे बौद्ध धम्माचा प्रसार करण्याचे सांगण्यात आले. बौद्ध धर्म कसा पुण्यकारक आहे. त्याचबरोबर बौद्ध धम्म हा इतर धर्मांपेक्षा अतिउत्तम कसा आहे, या विषयाची शिकवण दिली. त्यामुळे खुद जपान आणि पूर्वेकडील राष्ट्रांमध्ये बौद्ध धम्माचा प्रसार मोठ्या प्रमाणात घडून आला. बौद्ध धम्माला खऱ्या अर्थाने गरज आहे ती राजाश्रयाची. राजाश्रय मिळाल्याशिवाय तसूभरही गोष्टी पुढे जात नाहीत किंवा परिवर्तन, विकास ह्या गोष्टीही घडत नाही. राजाश्रय आणि बुद्धिवादी दृष्टीकोन असलेली प्रचारक मंडळी असेल तरच धर्म तत्वज्ञान सामान्याच्या गळी उत्तरविण्यास सोपे जाते. बुद्धाचे तत्वज्ञान तर सर्वसामान्य माणसाला जवळचे वाटते. गरज आहे ती फक्त त्यांच्यापर्यंत पोहचविण्याची आणि अशी हे कार्य भारतातच नव्हे तर जागतिक पातळीवर होताना दिसून येत आहे.

**विविध देशांतील बौद्ध धर्मीयांची लोकसंख्या**

बौद्ध धर्म हा जगातील एक प्रभावी धर्म असून या धर्माचे 1.8 अब्ज ते 2.1 अब्ज लोक अनुयायी आहेत. लोकसंख्यांचा दृष्टीने हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा धर्म आहे. जगातील लोकसंख्येमध्ये 24 ते 29 टक्के बौद्ध लोकसंख्या आहेत. चीन देशात सर्वाधिक बौद्ध धर्मिय आहेत. तेथील 91 टक्के चीनी लोकसंख्या (122 कोटी) बौद्ध धर्मीय आहे. जगातील जवळ जवळ 20 देशांत बौद्ध धर्म हा बहुसंख्यक आहे. आज सर्वच खंडात भगवान बुद्धाचे अनुयायी आहेत. आशिया खंडात तर बौद्ध धर्म हा मुख्य धर्म आहे. आशिया खंडाची जवळपास अर्धी (49 टक्के) लोकसंख्या ही बौद्ध धर्मीय आहे. जगभरातील बुद्ध अनुयायांची लोकसंख्या ही 180 कोटी आहे. अनुयायाच्या तुलनेत येशु ख्रिस्तानंतर (2 अब्ज) जगतात. सर्वाधिक अनुयायी तथागत बुद्धांना (1.8) अब्ज लाभलेले आहेत. परतु भारतातील कोट्यावधी हिंदू धर्मीयांनी तसेच जगभरातील अनेक मानवतावादी विज्ञानवादी लोकांनी गौतम बुद्धांचे अनुयायीत्व पत्करले आहे. या सर्व बुद्ध अनुयायांची एकत्रित लोकसंख्या ही 2.3 अब्जांवर आहे. म्हणजेच तथागत बुद्ध जगात सर्वाधिक अनुयायी (2.3 अब्ज) असेलेले सर्वाधिक प्रभावशाली धर्म संस्थापक तत्वज्ञ आहेत.

बौद्ध धर्मामध्ये साधारणपणे 70 टक्के ते 65 टक्के महायानी बौद्ध आणि उर्वरित 24 टक्के थेरवादी, नवयानी (भारतीय) आणि वज्रयानी बौद्ध आहेत. महायान और थेरवाद (हीनयान) नवयान, वज्रयान यांच्या व्यतिरिक्त बौद्ध धर्मात यांच अनेक उपसंप्रदाय किंवा उपपंथ सुद्धा आहेत. परतु त्यांचा प्रभाव खूप कमी आहे. सर्वात जास्त बौद्ध पूर्व आशिया आणि आग्नेय आशियाच्या सर्व देशांत बहुसंख्यकांच्या रूपात राहतात. दक्षिण आशियाच्या दोन किंवा तीन देशात सुद्धा बौद्ध धर्म बहुसंख्यांक आहे. आशिया खंडाची जवळ जवळ अर्ध्यापेक्षा अधिक लोकसंख्येवर बौद्ध धर्माचा सखोल प्रभाव आहे. अमेरिका, ऑस्ट्रेलिया, आफ्रिका आणि युरोप सारख्या खंडामध्ये सुद्धा कोट्यावधी बौद्धांचे समुदाय

राज्यात बौद्ध धर्माचा सांप्रत काळी किती प्रसार झाला आहे. बुद्ध धर्मानुयायी जनांचे मुख्य दोन वर्ग करतात. एक दक्षिणेकडील वर्ग व दुसरा उत्तरेकडील वर्ग.[4]

कनिष्क राजाचा पूर्ण आश्रय मिळाल्यामुळे उत्तरेकडील बौद्धांनी आपल्या धर्माचा प्रसार त्याचा विस्तीर्ण राज्यात पोहोचकडे केला. इ.स. पूर्व दुसऱ्या शतकामध्ये काश्मिरहून काही बुद्ध धर्म प्रसारकांनी बुद्ध धर्म ग्रंथ चीनच्या बादशहापाशी नेले. इ.स. 62 सालात चीनच्या गादीवर जो बादशहा होता त्याने आणखी काही बुद्धधर्माचे ग्रंथ मिळवून नेले. ह्या वेळापासून पुढे बुद्ध धर्माचा प्रसार चीन देशात झपाट्याने झाला आणि चौथ्या शतकामध्ये चीनी राष्ट्राचा हा मुख्य धर्म होऊन बसला.

चीन देशातून बुद्ध धर्माचा प्रवेश कोरिया प्रांतात इ.स. 372 सालात झाला आणि कोरियातून ते इ.स. 552 सालात जपानमध्ये प्रसार पावला. चौथ्या व पाचव्या शतकामध्ये कोचीन, चीन, फोर्मोसा, मंगोलिया इत्यादी प्रांतात बुद्ध धर्म चीनमधून गेला. आणि काबूलहून गेलेल्या धर्मप्रसारकांनी तो यार्कन्द, बाल्क बोखारा वगैरे ठिकाणी प्रस्तुत केला.

नेपाळमध्ये बुद्ध धर्माचा सार्वत्रिक प्रसार सहाव्या शतकामध्ये झाला. परंतु या देशात या धर्माचा प्रवेश पूर्वीच झाला असे म्हणण्यास पुष्कळ आधार आहे. त्याचप्रमाणे तिबेटमध्ये तो याच सुमारास प्रसार पाहून इ.स. 662 मध्ये त्या देशाच्या राजाने आपले वकील हिंदुस्थानातून बुद्धधर्म ग्रंथ आणावयास पाठविलेले होते. एकंदरीत या उत्तरेकडील बुद्धधर्मपंथाचा प्रसार पश्चिमेस कास्पिअन समुद्रापासून तो पूर्वेस जपानपर्यंत झाला होता.[5] अशा प्रकारे सर्व जगाला आपल्या तत्वज्ञानाने व्यापणारा जगातील पहीला धर्म म्हणजे बौद्ध धर्म होय. बौद्ध धम्माचा संपूर्ण भार नैतिक जिवनावर असल्याचे आढळते. भगवान गौतम बुद्धाने माणसाला दुःखापासून मुक्तता आपल्या उपदेशातून दिला दिला आहे. गौतम बुद्धाच्या तत्वज्ञानाचा प्रभाव आज आपणांस संपूर्ण जगावर असल्याचे दिसून येते. बुद्धाच्या धम्माचा केंद्र बिंदू फक्त माणूसच नाही तर सर्व समाज जिवन नितीमय असावे अशी तत्वज्ञानाची मांडणी केली व आज धम्माच्या तत्वज्ञानामुळे मानवतावाद स्वातंत्र्य, समता व बंधुता या मानवी मुल्यावर आधारित असल्यामुळे बहुतांश बौद्ध राष्ट्रांनी आज तत्वज्ञानाच्या युगात विज्ञानाने अफाट असे योगदान दिले आहे. हा वैज्ञानिक दृष्टीकोन कालांतराने विकसीत होत गेलेला नेहमी आपल्या अवलोकनात आला आहे. पण त्याची बीज त्यांची मुळं ही बुद्धाच्या ज्ञान प्राप्तीतून 2500 वर्षापूर्वीच रूजविली गेली होती. आजचे शास्त्रज्ञ विविध प्रयोगातून नवनविन शोध लावीत आहेत. त्याचा आधार आपल्याला बुद्धधम्मामध्ये दिसून येते.

संदर्भ

1. मोरे मा. श., जगातील बुद्ध धम्माचा इतिहास (कौशल्य प्रकाशन)
2. https://en.m.wikipedia.org/wiki/Religion_in_Thailand.
3. मोरे मा. श., उपरोक्त पृ.क्र. 245 ते 246
4. केळूसकर क्र. अ., गौतम बुद्धांचे चरित्र, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, दुसरी आवृत्ती 2015, पान क्र. 22
5. कित्ता, पान क्र. 232



# INTERNATIONAL CENTRE FOR BUDDHIST STUDIES



International Conference on

## BUDDHISM IN CONTEMPORARY TIMES : RELEVANCE FOR PEACE, NON-VIOLENCE AND SOCIAL HARMONY

**Guru Nanak Hall, Ambazari, Nagpur**

**International Centre for Buddhist Studies, Ramdaspeth, Nagpur**

# Conference Abstracts

ICBS 2018

Scanned with CamScanner

## Programme Schedule - Day I

| Day – I : 21st June 2018 | Gurunanak Bhavan | |
|---|---|---|
| 9am – 10.30am | **Registration** | |
| 10:30am– 12.45pm | **Inaugural Programme** | |
| | -Vidyapeeth Geet | |
| | -Introductory Speech | |
| | -Introduction to the Chief Guest | Dr. Puranchandre Meshram |
| | - Inaugural Speech by Chief Guest | |
| | - Introduction to the key Note Speech | Phra Anil Sakya, Thailand |
| | -Key Note Address | |
| | **Book Release-**<br>1. Conference Souvenir and Abstracts Volume<br>2. Souvenir of Various Projects Implemented by the University on the Eve of 125th Birth Anniversary of Dr. Babasaheb Ambedkar<br>3. Book Authored by Dr. M. S. Wankhede titled "Dalit Wrtinings: Reality of Marginalized Communities of India | Dr. Sukhdeo Thorat |
| | -Presidential Address | |
| | Vote of Thanks | Dr. Siddharthvinayak Kane |
| 1.00pm – 2:00pm | **Lunch Break** | |
| 2.00 pm- 4.00pm | **Technical Session - I** | |
| | **Chairperson:** Dr. Mahesh Deokar | **(Theme - I)** |
| | Invited Speakers –<br>(1) Prof. Y.S. Alone<br>(2) Bikku Dr. Anand<br>(3) Dr. Ajay Verma | **Paper Presenters**<br>Baliram Bansod<br>Jwala Dohane<br>Ven Suriya<br>Chandrashekhar Patil<br>Pravin Raut<br>A B. Dongre & Niraj Bodhi |
| 4.00pm – 4.15pm | **Tea Break** | |
| 4:15pm – 6.00pm | **Technical Session - II** | |
| | **Chairperson:** Dr. Siddharth Singh | **(Theme -II)** |
| | Invited Speakers –<br>(1) Dr. Saw Sander<br>(2) Dr. Liu Jinxiu | **Paper Presenters**<br>• Vijayalaxmi Nag<br>• M. S. Wankhede<br>• Rahul K. Kamble<br>• Saroj Chaudhary<br>• Milindkumar Khelkar<br>• Jyoti Mandrele<br>• Lekhram Selokar<br>• Nutan Chavan<br>• Niraj Bodhi<br>• Harish Walke<br>• Pranoti Kamble<br>• Tathagat Gajbhiye<br>• Rahul Tagade<br>• Lata More<br>• Bhadant Chandrakitti<br>• Rashtrapal Meshram<br>• Anita Mudaliyar& Asmita Mudaliyar<br>• Dr. Saroj Wani |

Scanned with CamScanner

**Abstracts Contents**


| Sr. No. | Name of the Author | Title of the Paper | Page No |
|---|---|---|---|
| 1 | Prof. Y. S. Alone | Analyzing Contemporary through '*Pratityasamutpad*' | |
| 2 | Baliram S. Bansod | Ethico-Philosophical Concept In Buddhism | 1 |
| 3 | ज्वाला डोहाणे | "वैश्विक समाज चिंतन पर बौद्ध धम्म तत्वज्ञान का प्रभाव" | 2 |
| 4 | Ven Suriya | Deliberation The Prābavasutta(Downfall Discourse) | 3 |
| 6 | Ajay Verma | 'Is Metaphysics Necessary for Religion?: A Review of Buddhist Critique' | 4<br>5 |
| 7 | चन्द्रशेखर पाटील | "भगवान बुध्द व तत्वज्ञान" | |
| 8 | ।££ FbE (£0. "dE>ðIE | बुध्द के दार्शनिक विचार और बाविस प्रतिज्ञाएं | 6 |
| 9 | A.B. Dongre And Neeraj Bodhi | Scientific Analysis Of Buddhist Philosophy Of middle way Doctrine of Emptiness or shunyata | 7<br>8 |
| 10 | Dr. C. D. Naik | Buddhism and World Peace | |
| 11 | Liu Jinxiu | Buddhism and Contemporary ChineseLiterature | 9 |
| 12 | Saw Sander | Relevance of Peace and Harmony based on Buddha's Teachings | 10<br>11 |
| 13 | Vijayalaxmi M. Nagrar | Buddhist perspectives on peace, conflict and Non-Violence- Country papers | 12 |
| 14 | M. S. Wankhede | Buddhist Perspectives on Peace, Conflict and Non-violence | 13 |
| 15 | Saroj Chaudhary | Buddhist Perspectiveson Peace, Conflict and Nonviolence- Country Papers | 14 |
| 16 | Milindkumar Khelkar | Buddhist Perspectives on Peace and Non-Violence | 15 |
| 17 | ज्योति मन्द्रेले | वैश्विक शान्ति एवं सामाजिक समरसता के संदर्भ में बौद्ध धम्म का अहिंसावादी चिंतन | 16 |
| 18 | लेखराम सेलोकर | शांति, संघर्ष और अहिंसा पर बौद्ध दृष्टिकोण | |
| 19 | Nutan V. Chouhan | Buddhist Perspective on Peace and Social Harmony | 17 |
| 20 | Niraj G. Bodhi | A Role of Da□□a Vaggo in Peace, Non-violence & Social Harmony | 18<br>19 |
| 21 | Harish E. Walke | Vipassana for coming generation towards peace, happiness and social harmony | 20 |
| 22 | Pranoti S. Kamble | Buddist Philosophy For The Golbal Peace | |
| 23 | तथागत पी.राजभिये | बुद्ध धम्म और विश्वशांति | 21 |
| 24 | राहुल सी.तागडे | बुद्ध धम्म : एक वैश्विक युटोपिया | 22<br>23 |
| 25 | Lata Kalnuji More | Buddhism Concept of Peace, Morality and Non-Violence | 24 |
| 26 | Siddharth Singh | Art to Live in Pluralistic Societies: Learnings from Buddha-Dhamma | 25 |
| 27 | Bhadant Chandrakitti | तथागत गौतम बुद्ध के शान्ति तत्व की वर्तमान समय में प्रासंगिकता | 26 |
| 28 | Rashtrapal Meshram | Buddhism: Real Path Of Peace, Happiness, Welfare And Mankind | 27 |
| 29 | Anita J.Mudaliar and Asmita L.Mudaliar | Buddhism: A Facet in the framework of World peace | 28 |


Scanned with CamScanner

# BUDDHIST PHILOSOPHY FOR THE GOLBAL PEACE

Astt. Prof. Pranoti S. Kamble

(International Conference on Buddhism in Contemporary Times Relevance for Peace, Non-Violence and Social Harmony)

Buddhism teaches that whether we have global or global war is up to us at every moment. The situation is not hopeless and out of our hands. If we don't do anything, who will? Peace or war is our decision. The fundamental goal of Buddhism is peace, not only peace in this world but peace in all worlds. The Buddha taught that the first step on the path to peace is understanding the causality of peace. When we understand what causes peace, we know where to direct our efforts. No matter how vigorously we stir a boiling pot of soup on a fire, the soup will not cool. When we remove the pot from the fire, it will cool on its own, and our stirring will hasten the process. Stirring causes the soup to cool, but only if wwe first remove the soup from the fire. In other words, we can take many actions in our quest for peace that may be helpful. But if we do not first address the fundamental issues that cause disharmony and unrest, all other actions will come to naught.

The Buddha taught that peaceful minds lead to peaceful speech and peaceful actions. If the minds of living beings are at peace, the world will be at peace. One many ask as to who has a mind at peace in this world. The overwhelming majority of us live in the midst of mental stroms that subside only for brief and treasured moments. We could probably count on the fingers of both hands the number of those rare, holy persons whose minds are truly, permanently at peace. If we wait for all beings in the world to become sages, what chance is there of a peaceful world for us? Even if our minds are not completely peaceful, is there any possibility of reducing tfe levels of violence in the world and of successfully abating the winds of war ?



Scanned with CamScanner

Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VII ISSUE- II FEBRUARY 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

# बौद्ध धर्माचा दक्षिणपुर्व आशिया व जपान मधिल प्रसार – तेंदाई संप्रदायाच्या संदर्भात एक विश्लेषणात्मक अभ्यास

संशोधक
प्रा. प्रणोती म. सहारे
डॉ. मधुकरराव वासनिक पी.डब्ल्यू.एस
कला व वाणिज्य महाविद्यालय नागपूर

मार्गदर्शक
प्रा. डॉ. बालचंद्र एन. खांडेकर
निवृत्त विभागप्रमुख (पाली प्राकृत विभाग)
पी.डब्ल्यु.एस.महाविद्यालय, नागपूर

प्रस्तावना

बौद्ध धर्म (बौद्ध धम्म) हा भारताच्या श्रमण परंपरेतून निर्माण झालेला केवळ एक महान धर्म नसुन एक महत्वपूर्ण तत्वज्ञान आहे. बौद्ध धर्म हा जगातील अतिप्रचिन व जगभर पसरलेला धर्म आहे. इ.स.पू. ६ व्या शकतात बौद्ध धर्माची स्थापना झालेली आहे व तथागत बुद्ध हे बौद्ध धर्माचे संस्थापक आहेत. तथागत बुद्धांच्या महापीरनिर्वाणानंतर पुढील दोन शतकात सम्राट अशोकांच्या काळात बौद्ध धर्माचा भारतभर प्रसार झाला आणि त्यापुढील दोन हजार वर्षांमध्ये हा धर्म मध्य, पूर्व आणि आग्नेय जम्बुमहाद्वीपामध्ये (ईस्ट इंडीज) व सर्व जगात पसरला. बौद्ध धर्म हा आपल्या जन्मस्थानापासून निघून जगभर पसरलेला जगातील पहिला विश्वधर्म (जगाचा धर्म) होय. बौद्ध धर्म हा निरीश्वरवादी, अनात्मातावादी, समतावादी, विज्ञानवादी, मानवतावादी धर्म होय. बौद्ध धर्म हा स्वातंत्र्य समता, बंधुत्व, करूणा, मैत्री (प्रेम), प्रज्ञा, मानवी, मूल्यें विज्ञानवाद या तत्वांचा पुरस्कर्ता आहे. बौद्ध धर्म हा आधुनिक विज्ञान आणि मानवी मूल्यांचे समर्थन करणारा जगातील एकमेव धर्म आहे.

## बौद्ध धर्माचा प्रसार

बौद्ध धर्म हा जगातील एक प्रभावी धर्म असून या धर्माचे १.८ अब्ज ते २.१ अब्ज लोक अनुयायी आहेत. लोकसंख्येच्या दृष्टीने हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा धर्म आहे. जगातील लोकसंख्येमध्ये २५ टक्के ते २९ टक्के बौद्ध लोकसंख्या आहेत. चीन देशात सर्वाधिक बौद्ध धर्मिय आहेत. तेथील ९१ टक्के चीनी लोकसंख्या (१२२ कोटी) बौद्ध धर्मीय आहे. जगातील जवळजवळ २० देशांत बौद्ध धर्म हा बहुसंख्यक आहे. आज सर्वच खंडात भगवान बुद्धांचे अनुयायी आहेत. आशिया खंडात तर बौद्ध धर्म हा मुख्य धर्म आहे. आशिया खंडाची जवळपास अर्धी (४९ टक्के) लोकसंख्या ही बौद्ध धर्मीय आहे. जगभरातील बुद्ध अनुयायांची लोकसंख्या ही १८० कोटी आहे. अनुयायांच्या तुलनेत येशू ख्रिस्तानंतर (२अब्ज) जगतात सर्वाधिक अनुयायी तथागत बुद्धांना (१.८ अब्ज) लाभलेले आहेत. सर्व बुद्ध अनुयायांची एकत्रित लोकसंख्या ही २.३ अब्जांवर आहे. म्हणजेच तथागत बुद्ध जगात सर्वाधिक अनुयायी (२.३ अब्ज) असलेले व सर्वाधिक प्रभावशाली धर्म संस्थापक, तत्वज्ञ आहेत.

## बौद्ध धर्मप्रसाराचा इतिहास

गौतम बुद्ध आणि त्यांचे शिष्य ज्या प्रांतातून धर्मबोध करीत हिंडत असत व वर्षाकाठी ज्या नगरासन्निध बिहारांमध्ये जात असत, त्यांच्या नावावरून पाहता बुद्धाच्या हयातीत त्याच्या धर्माचे अनुयायी हिंदुस्थानच्या पूर्वेकडील प्रांतातच विशेषकरून झाले होते असे दिसते. मुख्यत्वेकरून काशी, कोसल आणि मगध ह्या प्रांतात त्याच्या धर्माचा प्रसार पुष्कळ झाला होता. शिवाय अयोध्या व बिहार ह्या प्रांतातही त्याचे अनुयायी पुष्कळ झाले होते. काही ग्रंथांच्या आधारावरून असे कळते की, बुद्धाचे शिष्य पश्चिमेकडील मुलखातही धर्मबोध करीत वेळोवेळी हिंडत असत. बुद्धाच्या अनुयायांसाठी मगध व कोसल या प्रांतातील बहुतेक मुख्य नगराजवळ आणि श्रीवास्ती (साहेतमाहेत) व राजगृह (राजघर) ह्या राजधानीच्या नगराजवळ विहार

बांधून दिले होते. स्वत: बुद्ध या नगरांजवळील विहारात कधी कधी येऊन राहत असे. बुद्धाचे देहावसान झाल्यार त्याच्या शिष्यांनी स्वगुरूंचा धर्मोपदेशक्रम सतत चालविला होता; पण बुद्धानंतर त्याच्या धर्मांचा प्रसार हिंदुस्थानातील आणखी कोणकोणत्या प्रांतात झाला त्याची माहिती उपलब्ध नाही.

**बौद्ध धर्मांचा भारताबाहेरील प्रसार**

सयामदेशात बौद्धधर्मांचा प्रसार इ.स. ६३८ मध्ये झाला. ह्या सुमारास जावा बेटामध्ये बौद्धधर्मप्रसारक थेट हिंदुस्थानातून गेले असून यांनी तेथे स्वधर्मप्रसार केला. ह्या बेटातून पुढे हा धर्म बाली व सुमात्रा ह्या बेटात प्रसार पावला असे म्हणतात. दक्षिणेकडे बुद्धास जसे अशोकाचे पाठबळ मिळून त्याच्या पंथाचा चोहोकडे प्रसार झाला; तसेच उत्तरेकडे बुद्धास शकांच्या कनिष्क नामक राजाचे साहाय्य मिळाले. सदरील ग्रीक लोकांचे राज्य बुडवून शकांनी आपली सत्ता तेथे स्थापित केली तेव्हा ह्या शकांच्या राजानी (कनिष्क) बौद्धधर्मांचा स्वीकार केला. ह्या शकांचा कनिष्क हा महाप्रतापी राजा होय. कनिष्कराजाचा पूर्ण आश्रय मिळाल्यामुळे उत्तरेकडे बौद्धांनी आपल्या धर्मांचा प्रसार त्याच्या विस्तीर्ण राज्यात चोहोकडे केला. इसवी सनापूर्वी दुसऱ्या शतकामध्ये काश्मिराहून काही बौद्धधर्मप्रसारकांनी बौद्धधर्मग्रंथ चीनच्या बादशहापाशी नेले. इ.स. ६२ सालात चीनच्या गादीवर जो बादशहा होता त्याने आणखी काही बौद्धधर्मांचे ग्रंथ मिळवून नेले. ह्या वेळापासून पुढे बुद्धधर्मांचा प्रसार चीन देशात झपाट्याने झाला आणि चौथ्या शतकामध्ये चिनी राष्ट्राचा हा मुख्य धर्म झाला.

चीन देशातून बौद्धधर्मांचा प्रवेश कोरिआ प्रांतात इ.स. ३७२ सालात झाला आणि कोरिआतून तो इ.स. ५५२ सालात जपानमध्ये प्रसार पावला. चौथ्या व पाचव्या शतकामध्ये कोचीन, चीन, फोर्मोसा, मंगोलिया इत्यादी प्रांतात बुद्धधर्म चीनमधून गेला आणि काबुलहून गेलेल्या धर्मप्रसारकांनी तो यार्कन्द, बाल्क, बोखारा वगैरे ठिकाणी प्रसृत केला. नेपाळमध्ये बुद्धधर्मांचा सार्वत्रिक प्रसार सहाव्या शतकामध्ये झाला. त्याचप्रमाणे तिबेटमध्ये तो सुमारास प्रसार पावून इ.स. ६३२ मध्ये त्या देशा राजाने आपले वकील हिंदुस्थानातून बुद्धधर्म ग्र आणावयास पाठविले होते. एकंदरीत या उत्तरेकडी बुद्धधर्मपंथाचा प्रसार पश्चिमेस कास्पिअन समुद्रापासू तो पूर्वेस जपानपर्यंत झाला होता.

**जपानमध्ये बौद्ध धम्माचा उदय आणि विकास**

जपानमध्ये बौद्ध धर्म तळागाळातून न येत तो सम्राटाच्या संमतीने राजदरबारातून लोकांत आला. कोरियाच्या राजाने जपानच्या सम्राटाला लिहिलेल्या पत्रात बौद्ध धर्मांचा प्रसार करणे कसा पुण्यकारक आहे असे लिहिले आहे आणि बौद्ध धर्मांचा पुरस्कार केला. तत्कालीन राजांना असे वाटत होते की बौद्ध धर्मात बऱ्याच गोष्टी घडविण्यासाठी शक्ती आहे. परंतु नंतरच्या काळात देशाचे संरक्षण करण्यासाठी आणि देशात शांतता नांदावी म्हणून बौद्ध धर्माकडे पाहिले जात असे. जपानमध्ये बौद्ध धर्मांचा उदय व विकास होण्याआधी चीन व कोरीया या देशांमध्ये बौद्ध धर्म प्रस्थापित झाला. भौगोलिकदृष्ट्या जापान भारताचा शेजारी राष्ट्र नाही परंतु धार्मिक दृष्ट्या जापानची संस्कृती भारताशी मिळती जुळती आहे. जापान या देशानी बौध्द धर्माला जीवनाच्या प्रत्येक क्षेत्र, जसे सामाजिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक इत्यादीमध्ये सामिल केले आहे. इलियट यांच्यानुसार ५५२ ई. मध्ये बौध्द धर्म चीन व कोरियाहून जापानपर्यंत पोहोचला. राहुल सांस्कृतायन यांच्या मते ५३८ ई. मध्ये दक्षिण कोरियातील कुदरा राज्याच्या राजानी जापानच्या राजाला बौध्द ग्रंथ, बुध्दाची मूर्ती, पूजा साहित्यासोबत एक पत्र पाठविले होते. त्या पत्रात खालील ओळी लिहल्या होत्या:-

"हा धर्म सर्व क्षेत्रातील शिक्षणामध्ये उत्तम आहे. या धर्माला समजणे कठीण आहे. चीनच्या मुनींना पण ह्या धर्माला समजण्यात वेळ लागला. या धर्मावर विश्वास ठेवणाऱ्या व्यक्तिला अत्यंत सुखाची अनुभूती होत असून त्यांना बुध्दत्वाची प्राप्ती होते. सर्व इच्छांची पूर्ती करणाऱ्या चिंतामणि रत्नासारखाच हा धर्म मनुष्याच्या सर्व आशा अभिलाषांची पूर्ती करतो. या धर्मांचा प्रसार

भारतापासून सुरू झाला असून कोरियापर्यंत पोहोचला आहे. त्याचप्रमाणे शेजारचे सर्व राष्ट्र या धर्माचे अनुयायी झाले आहेत."

या पत्रामुळे जापानमधील जनतेमध्ये बौध्द धर्मासंबंधी जागरूकता निर्माण झाली व थोडया विरोधानंतर जापानमध्ये बौध्द धर्माचा प्रसार सुरू झाला. राहुल सांस्कृतायन यांच्या मते चीनपासून बौध्द धर्म जापान देशात पोहोचला. ५२२ ई. मध्ये सिवा तचिता नावाची एक चीनी बौध्द यात्री चीनच्या पूर्वी तटाकडून जापानमध्ये निर्वासित झाली. जापानची प्रथम बौध्द भिक्खुनी याच वंशाची होती. सातव्या शतकाचे सर्वश्रेष्ठ चित्रकार देखील याच वंशाचे होते.

पूर्वी जापानी धर्मात पितृ–पूजेचे प्रचलन होते ज्याचे नाव 'सिन्तो' होते. बौध्द धर्मानी या धर्माला देशातून हटविण्याचा प्रयत्न कधीच केला नाही. दोन्हीही धर्म अनेक बुध्द व बोधिसत्वांद्वारे चालविले जाते असे लक्षात येते. पण सातव्या शतकात सिन्तो धर्मातील सर्व विहार बौध्द धर्माला सोपविण्यात आले. जापानच्या राजदरबारात प्रवेश करण्याकरिता बौध्द धर्माला ३६ वर्षापर्यंत प्रयत्न करावे लागले. सम्राट सुशुन तश्री व त्यांची पत्नी दोन्हीही बौध्द अनुयायी होते. सम्राटद्वारे त्याच्या १९ वर्षीय पुत्र शोतोकला राजकुमार बनविण्यात आले. पण ५९२ ई.मध्ये सम्राटाच्या मृत्युनंतर बौध्द धर्माविरोधी लोकांनी त्याला राज सिंहासनावरून निष्कासित करून त्यांच्या काकु सुई ला राज सिंहासनावर बसविले. बौध्दांच्या विरोधामुळे हे शासन जास्त वेळ टिकू शकले नाही.

५९२ ई. मध्ये राज सिंहासन प्राप्त झाल्यानंतर शोतोक नी बौध्द धर्माला राजधर्म म्हणून घोषित केले. तेन्नोजीचे आश्रम ओसाका इथे स्थापित करून याच्या चारही दारांवर बौध्द देवतांची विहारे बनविली. त्याचप्रमाणे शाळा व चिकित्सालयांची स्थापना करून साहित्य, धर्म व दार्शनिक शिक्षणावर भर दिला. शोतोक स्वत: माध्यमिक दर्शनाचे विद्वान होते. सम्राट शोतोक हे ध्यानी व्यक्ति असून त्यांनी स्वत:च्या हातानी बनविलेली अवलोकितेश्वरची कास्याची मूर्ति 'होर्योजीच्या' विहारामध्ये स्थापित केली. ते या विहारामध्ये नित्यनियमाने ध्यान साधना करीत होते. भारतातील बौध्द गयाप्रमाणे या विहाराची मान्यता जापानमध्ये आहे. या विहाराला जापानी राष्ट्रीयतेचे प्रतीक समजल्या जात असून आजही हा विहार जापानी इतिहासाची कार्यशाळा आहे. डॉ. महामरू आन साकी यांच्यानुसार 'शोतोक यांचा ३० वर्षाचे शासन म्हणजे जापानी इतिहासातील अत्यंत युग प्रवर्तक असा काळ आहे'. शोतोक हे जापानी सभ्यतेचे स्थापक व राष्ट्रीय समतेचे निर्माते होते. ६२१ ई मध्ये त्यांचा मृत्यु झाला. व त्यावेळी संपूर्ण जापान देश शोकाकुल झाला. जपानमधील बौध्द धर्माचे संप्रदाय

राहुल सांस्कृतायन यांच्या मते जपानमधील बौध्द धर्मात अकरा संप्रदायांचा समावेश असून त्यांचे स्थापना वर्ष खालीलप्रमाणे आहे–

| अ.क्र. | पंथाचा नांव | स्थापना वर्ष |
|---|---|---|
| १ | होस्सो | ६२९–७०० |
| २ | केगोन | ७४२ |
| ३ | रित्सु | ७५४ |
| ४ | तेन्दाई | ७८८ |
| ५ | शिग्डोन | ८१५ |
| ६ | युजु नेम्बुत्स | १११७ |
| ७ | जेन | ११४०–१२१५ |
| ८ | जोदो | ११७४ |
| ९ | शिन्शु | ११७३–१२४२ |
| १० | निचिरेन | १२२२–१२८९ |
| ११ | जिशू | १२३९–१२६२ |

जपान मध्ये हिनयान व महायान दोन्हीही पंथ प्रसिध्द राहिले आहे पण महायानचा प्रभाव हिनयान पंथापेक्षा अधिक आहे. हीनयान पंथ कुश जोतिसु आहे. दोन्ही यानामध्ये फक्त विनम्रतेचा फरक असून हे यान सारखेच आहेत. फूजीवारा युगात कला व संस्कृतीच्या क्षेत्रात बौध्दांचे वर्चस्व होते तसेच जापानच्या राजकारणामध्ये ही बौध्दांचा प्रभाव असून त्यांच्याकडे भिक्खु सैन्यबळ ही होते. जपानमध्ये राजाच्या परिनिर्वाणानंतर राजधानी बदलण्यात येत होती. कारण ती अपवित्र झाली असे समजले जात



Scanned with CamScanner

होते. ७०९ ई. मध्ये नारायेथे स्थायी राजधानी बनविण्यात आले व नविन मठ व विहारांचे निर्माण करण्यात आले. ७५२ ई. मध्ये भगवान बुध्दाची धातुची मूर्ति या नगरामध्ये स्थापित करण्यात आली. या मूर्तिला 'दाई बुत्सु' (महाबुध्द) म्हणून संबोधण्यात येते. या मूर्तिच्या प्राण प्रतिष्ठा महोत्सवात भारत, कोरिया, चीन इत्यादि देश सहभागी झाले होते.

## जपानमध्ये तेंदाई पंथाची स्थापना, विस्तार आणि संस्थापक

तेंदाई पंथ बौध्द धर्माचा विशेष प्रकार आहे ज्यामध्ये बौध्द धर्माच्या दोन्ही तत्व – थेरावादा व महायान बौध्द धर्माचा समावेश आहे. कमळ सूत्र तेंदाई पंथाचे मुख्य मंत्र आहे. या पंथाच्या अनुयायींप्रमाणे निर्वाणाची प्राप्तीकरिता या मंत्राची उच्चार करणे फायदेशीर ठरते. तेंदाई पंथाची स्थापना ८ व्या शतकाच्या अंतमध्ये (१० ऑक्टोबर ७६६ मध्ये) क्योटोच्या एनरायकुजी मंदिराच्या हाई पर्वतरावर करण्यात आली. तेंदाई पंथाचे संस्थापक साएचो (७६२–८२२) यांनी बौध्द धर्माचे शिक्षण ध्यान, तांत्रिक विद्या व कमळ सूत्रासंबंधी ज्ञान चीनच्या ताइंत–ताई शाळेत घेतले. जापानला परत आल्यानंतर त्यांनी प्रेक्षकांमध्ये या पंथासंबंधी विश्वास स्थापित केला कि बौध्द धर्माच्या शिक्षणाद्वारे कुठले ही वर्ग, सामाजिक स्थितीचे लोक निर्वाणची प्राप्ती करू शकतात. साएचो हे डेंग्यो दाएशी या नावानी ही प्रसिध्द आहेत.

कान्मु (७३७–८०६ ०१८९ व सागा (७८६–८४२) या राजाच्या आश्रयाखाली तेंदाई पंथाला अधिकृत मान्यता मिळाली. नारा बौध्द धर्मगुरूंच्या राजकीय शक्तीपासून त्रासलेले राजांनी या पंथाला प्रोत्साहन दिले. साएचो द्वारा स्थापित एनरायकुजी मंदिरात बुध्दाची मूर्ति, बोधीसत्वाच्या देवतांची स्थापना हाईन काळात करण्यात आली. साएचोच्या मृत्यूपर्यंत तेंदाईला शाळा समजले जात नव्हते. हाई पर्वतावर भिक्खुंच्या प्रशिक्षणाची परवानगी मिळाल्यानंतर हाई पर्वतावर ३००० मंदिर बांधण्यात आले व ३०,००० भिक्खुंना प्रशिक्षण देण्यात आले. या पंथाच्या मठाद्वारे शस्त्रांचा वापर करण्यात येत असून शासनाला ही त्यांनी जबरदस्तीची मागणी केली. मुख्यत: सर्व पंथाची सुरूवात हाई पर्वतावरच झाली आहे. तेंदाई भिक्खुंद्वारे १२ व्या व १३ व्या शतकात दिनची स्थापना करण्यात आली. शुध्द जमीन, झेन व निकीरेन हे सर्व पंथ तेंदाई शाळेपासून सुरू झालेले आहेत.

## तेंदाई पंथाचे तत्वज्ञान

तेंदाई तत्वज्ञानमध्ये विविध दार्शनिक अंतर्दृष्टींचा समावेश आहे जे बौध्द तत्वज्ञान व जापानी संस्कृती जसे शिंटो व पारंपारिक सौंदर्य दर्शवितात. तेंदाई तत्वज्ञान बौध्द महायानच्या मते आत्मज्ञान प्राप्त करण्याची क्षमता सर्वामध्ये आहे. सर्व लोक बौध्द धर्मापासून मोक्षची प्राप्ती करू शकतात. महायानप्रमाणे हा अभूतपूर्व अनुभवाचा जग हा मुळत: बौध्द कायद्याची अभिव्यक्ती आहे. या मतानुसार मनुष्याला अनेक अनुभवांचा सामना करावा लागतो. याच्या उलट शिंगो बौध्द धर्माच्या मते आम्ही संपूर्ण जगाला बघतो ज्याचा अर्थ धर्म आहे. तेंदाई बौध्द धर्माप्रमाणे प्रत्येक इंद्रियगोचर हे धर्माची अभिव्यक्ति करतात. तेंदाई पंथाकरिता कमळ सूत्र हा धर्माची मुख्य अभिव्यक्ति आहे. म्हणूनच वेंराकोना बौध्दाच्या कमळ सूत्राच्या उपदेशांमध्ये सर्व अनुभवांचा समावेश आहे. अज्ञानी लोकांचे अनुभव व अस्तित्व ज्यांनी बोधिसत्वाला नर्कात जाणे घोषित केला आहे त्यांना ही कमळ सूत्राच्या शिक्षणात मूलभूतपणे समतुल्यपणे शिक्षण प्रदान केले जाते. तेंदाई तत्वज्ञानाच्या या दार्शनिक अंतर्दृष्टीमुळे जापानी व्यवसायी चीनी तेंताई बौध्द धर्म अंगीकारण्याकरिता प्रेरित झाले व ज्यामुळे तेंदाई धर्माचा जापानी प्रकार निर्माण झाला.

तेंदाई तत्वज्ञानात कामीला अत्यंत पवित्र समजले जाते. बौध्द अनुयायींच्या मते ज्ञानाची प्राप्तीकरण्याकरिता अनेक जीवनातील धर्मप्रति असलेली श्रध्दा व कार्य आवश्यक आहे परंतु कामीमध्ये सार्वत्रिक बुध्दत्व प्राप्त करण्याचा प्रतिनिधित्व केला जातो. त्यांच्याद्वारे जगाला

स्वाभाविक प्रबुध्द होणे हे सत्य जगासमोर ठेवण्यात येते की धर्मावर विश्वास करणारा कुठला ही व्यक्ती स्वत:च्या शरीरात ज्ञानाची प्राप्ती करू शकतो. हा ज्ञान अर्जित करणारा व्यक्ती बुध्दापेक्षा जास्त पवित्र असतो. शिंटोद्वारे 'कामी' यांना हिंसक व मानवजातीला विरोध करणारे समजले जाते कारण ते बौध्द कायद्याला मानत नाही.

| 38 | संत ज्ञानेश्वरांच्या चिद्विलास वादाची परंपरा | डॉ. निलीमा कापसे | 180 |
| 39 | कविता : अशास्त्राचे शास्त्र | डॉ. सुदाम राठोड | 186 |
| 40 | लोकगीतांचे स्वरूप | प्रा. सुनील जाधव | 192 |
| 41 | सुरेश भटांचे समकालीन विदर्भातील गझलकार | डॉ. संजय पोहरे | 195 |
| 42 | सदानंद देशमुख यांच्या ग्रामीण काव्यातील राजकीय जीवन | डॉ. एन. व्ही. शिंदे | 201 |
| 43 | आदिवासी कवितेतील 'बाप' | डॉ. सखाराम डाखोरे | 205 |
| 44 | समकालीन मराठी कविता 'हत्ती इलो'- अजय कांडर | डॉ. विजया पाटील | 209 |
| 45 | दलित कवयित्रींच्या कवितेची शैली | डॉ. राष्ट्रपाल मेश्राम | 214 |
| 46 | संतोष पद्माकर पवार यांच्या कविता | डॉ. सुदाम राठोड | 222 |
| 47 | आंबेडकरी विचारांचे वाग्मदार : लोकशाहीर वामनदादा गरुड | डॉ. सुरेश जाधव, प्रा. स्वप्निल गरुड | 226 |
| 48 | अण्णा भाऊ साठे यांची कादंबरी : एक अप्रत्यक्ष नाट्यात्मक अनुभव | डॉ. पी. एस. जुंबे, संतोष गालफाडे | 232 |
| 49 | 'गोतावळा' बदलत्या ग्रामव्यवस्थेचे परिणाम व्यक्त करणारी कादंबरी | डॉ. आर.डी. शिंदे | 235 |
| 50 | ग्रामीण कादंबरी 'पोटमारा' : एक आकलन | डॉ. शारदा मोरे | 239 |
| 51 | 'फेसाटी' भुकेचा जीवघेणा प्रवास | डॉ. संगीता शेळके | 243 |
| 52 | 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट' या कादंबरीतील स्त्रीप्रतिमा | डॉ. भैय्या पाटील | 249 |
| 53 | रंगनाथ पठारे यांचे समाज व संस्कृती विषयीचे समीक्षा विचार | डॉ. जयराम खाडे | 253 |
| 54 | मार्क्सवाद आणि मार्क्सवादी साहित्यविचार | डॉ. संदीप कदम | 259 |
| 55 | मार्क्सवादी इतिहासकार रोमिला थापर | डॉ. जगदीश खरात | 266 |
| 56 | झाडीपट्टी रंगभूमीवरील पहिले दंडारनाट्य : 'घायाळ वाघीण' | श्री. योगिनाथ नागराळे, डॉ. श्याम मोहुरकर | 271 |
| 57 | लेखक रवींद्र शोभणे : संकल्पपूर्तीच्या वाटेवरचा धाडसी प्रवासी | प्रा. संजय गोहणे | 276 |
| 58 | रंगनाथ पठारे यांच्या महाविद्यालयीन अनुभवविश्वातून चित्रित झालेल्या कथा | डॉ. जयराम खाडे | 282 |
| 59 | लाला लजपत राय यांची महिलांविषयीची भूमिका | डॉ. राजेंद्र रासकर | 290 |
| 60 | जपानमध्ये बौद्ध धर्माचा उदय आणि विकास | प्रा. प्रणोती कांबळे | 294 |
| 61 | महात्मा गांधी यांचे ग्राम विषयक विचार : एक चिकित्सक अभ्यास | डॉ. जी.टी. घोडे | 301 |
| 62 | पंडित जवाहरलाल नेहरूंचा इतिहासविषयक दृष्टीकोन | डॉ. जगदीश खरात | 304 |
| 63 | अमेरिकेचे परराष्ट्र धोरण व त्याचा जागतिक राजकारणावर होणारा परिणाम | डॉ.विमल राठोड | 310 |
| 64 | देशाच्या आर्थिक विकासात नोटबंदी/विमुद्रीकरणाची आवश्यकता | प्रा. संदिप गेटम | 315 |
| 65 | भारताची रोकड विरहित अर्थव्यवस्थेकडील वाटचाल | डॉ. पी. के. पाटील | 319 |

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Vol.8, Issue 3 - Recent Trends in Research
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
July-Sept.- 2021

# जपान मध्ये बौद्ध धर्माचा उदय आणि विकास

प्रा. प्रणोती कांबळे
विभाग प्रमुख पाली प्राकृत विभाग
डॉ.म.वा.पी.डब्ल्यू.एस.कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नागपूर

'जपान' उच्चार 'जपानी' हा पूर्व आशियामधील एक द्वीप–देश आहे. जपानच्या पश्चिमेला जपानचा समुद्र, चीन, उत्तर कोरिया, दक्षिण कोरिया व रशिया, उत्तरेला ओखोत्स्कचा समुद्र व दक्षिणेला पूर्व चीन समुद्र व तैवान आहेत. जपानी भाषेत 'जपान' या नावासाठी वापरल्या जाणाऱ्या कांजीचा (कांजी = चिनी / जपानी भाषेचे वर्ण) अर्थ 'सूर्य उगम' असा होतो. त्यामुळे आणि जपानच्या अतिपूर्वेकडील स्थानामुळे जपानला उगवत्या सूर्याचा देश असे संबोधण्यात येते.[1]

जपान प्रथम लिखित इतिहासात चीनी भाषेतील हानमध्ये प्रतीत होते. वी राज्यांचे रकमेनुसार, तिसरी शतकादरम्यान द्वीपसमूहवरील सर्वात शक्तिशाली साम्राज्याला यमॅटिकोकू असे म्हटले जाते. बाईकजे, कोरियापासून जपानमध्ये बौद्ध धर्म परिचय व प्रिन्स शोतोको यांनी पदोन्नती दिली होती परंतु त्यानंतरच्या जपानच्या बौद्ध धर्माचा विकास मुख्यत्वे चीनने प्रभावित केला. लवकर प्रतिकार असूनही, बौद्ध धर्म शासक वर्गाद्वारे प्रोत्साहित करण्यात आला आणि असुका काळात (५९२–७१०) सुरू होणारे व्यापक स्वीकृती प्राप्त झाली.

नारा काळ (७१०–७८४) हेव्होजी–क्यो (आधुनिक नारा) मधील शाही न्यायालयावरील केंद्रस्थानी असलेल्या जपानी राज्यातील एक उदय झाला. नाराचा काळ एखाद्या नवप्रसिद्धतेच्या तसेच बौद्ध–प्रेरित आर्ट व आर्किटेक्चरच्या विकासामुळे दर्शविला जातो. ७३५–७३७ च्या चेंमॉलपॉक्स रोगराईने जपानची एक तृतीयांश लोकसंख्या म्हणून मृत्युमुखी पडले असे मानले जाते. ७८४ मध्ये, सम्राट कानमूने राजधानी नारापासून नागाका–क्योपर्यंत, त्यानंतर ७९४ मध्ये हागिगागन–क्यो (आधुनिक क्योटो) येथे हलवला.[2]

हेनियन काळात सुरूवात झाली, ज्या दरम्यान एक विशिष्ट देशी जपानी संस्कृती उदयास आली, त्याच्या कला, कविता आणि गद्य साठी प्रसिद्ध. मुरासाकी शिकिबुच्या द गाय ऑफ जेनजी आणि जपानच्या राष्ट्रीय गीता 'किमिगायओ' या गीतांचे या वेळी लिहिले होते.

बौद्धधर्माच हेनयान काळात मुख्यत्वे दोन प्रमुख पंथांद्वारे पसरले होते, कोंकाई यांनी सैदा आणि सिंगोन यांनी. ११ व्या शतकाच्या उत्तरार्धात शुद्ध जमीन बौद्धधर्म (जोदो–शू, जोडो शिन्शु) खूप लोकप्रिय ठरली.

## जपानमधील बौद्ध धर्माचा उदय

इ.स. पूर्व ६ वे शतक हे प्राचीन भारताच्याच नव्हे तर जगाच्या इतिहासातील एक क्रांतीकारी शतक मानले जाते. या शतकाचे क्रांतीकारकत्व एक प्रचंड वैचारिक परमार्थिक आणि अध्यात्मिक चिंतनात सामावलेले आहे. या चिंतनाने मुक्त असे तत्वचिंतनाचे वातावरण निर्माण केले.[3] भगवान बुद्धाच्या काळी वैदीक धर्म त्यांच्या कर्मकांडातील जटीलतेमुळे घसरणीला लागलेला होता. बुद्धानी हिंसामुक्त यज्ञसंस्थेला पूर्णत्वया निरर्थक ठरविले ज्यामुळे बौद्ध धर्माचा प्रसार होण्यास मोठा हातभार लागला. त्यांनी भारतातील वैदीक रचनाकारांच्या ज्ञानाचा फोलपणा स्पष्ट केला.[4]

तत्कालीक निसर्गरूपी देवतांची उपासना करणाऱ्या काळातील आर्यधर्म उत्तरवेद काळात अधिक गुंतागुंतीचा बनला कर्मकांड वाढत गेले. यज्ञसंस्था प्रभावी बनली.[5] याचा परिणाम कर्मकांडाने सोम मोजण्यात झाला हा मुक्तीचा खरा मार्ग नव्हे असे काहीना वाटु लागले. मुक्तीचा मार्ग शोधणाऱ्या प्रयत्नात नवे चिंतन

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal | E-ISSN : 2348-7143
Vol.8, Issue 3 – Recent Trends in Research | July-Sept.- 2021
Peer Reviewed Journal

सुरु झाले. अंतिम सत्याचा शोध घेतला जाऊ लागला अनात्मवादी चिंतनातून अस्तीत्व नाकारणारे वेदप्रामाण्य नाकारणारे असे लोकायत बौद्ध आणि जैन तीन दर्शन विचार उदयाला आले.[४]

भगवान बुद्धाने स्वत:संबंधी अथवा आपल्या धम्मासंबंधी अपौरूशेयतेचा दावा मांडला नाही. त्याचा धम्म माणसाने माणसासाठी शोधून काढलेला आहे. तो अपौरूशेय म्हणजे साक्षात्कारी स्वरूपाचा नाही. प्रत्येक धर्माच्या संस्थापकाने आपण किंवा आपली शिकवण दैवी असल्याचा हक्क सांगितला आहे. जसे की येशू ख्रिस्ताने आपण देवपुत्र असल्याचे सांगून दैवीपणावर हक्क सांगितला आहे. इस्लाम धर्माचा प्रणेता महमंद पैगंबर याने स्वत:ला प्रेशित मानीत आहे. परंतू भगवान बुद्धाने असे कधीही सांगितले नाही. उलट धम्म हाच आपला उत्तराधिकारी आहे असे त्याचे प्रत्येक वेळी उत्तर होते.[५] भगवान बुद्धाच्या धम्माचा हेतू अविद्या हेतू अविद्या नष्ट करणे हा होता. अविद्या म्हणजे दु:खाच्या अस्तीत्वाविषयीचे अज्ञान होय. भगवान बुद्धाच्या धम्मात मानवी दु:खाचा अंत करण्याचा मार्ग दाखविला होता.[६] या कारणांमुळे बौद्ध धर्माचा प्रसार होण्यास सुरूवात झाली. बौद्ध धर्माचे तत्वज्ञान तार्किक असल्यामुळे पुर्वोत्तर आशियाखंडात बौद्ध धर्माचा प्रसार झपाट्याने होऊ लागला.

जपानमध्ये बौद्ध धर्म तळागाळातून न येत तो सम्राटाच्या संमतीने राजदरबारातून लोकांत आला. कोरियाच्या राजाने जपानच्या सम्राटाला लिहिलेल्या पत्रात बौद्ध धर्माचा प्रसार करणे कसा पुण्यकारक आहे असे लिहिले आहे आणि बौद्ध धर्माचा पुरस्कार केला. तत्कालीन राजांना असे वाटत होते की बौद्ध धर्मात बऱ्याच गोष्टी घडविण्यासाठी शक्ती आहे. परंतु नंतरच्या काळात देशाचे संरक्षण करण्यासाठी आणि देशात शांतता नांदावी म्हणून बौद्ध धर्माकडे पाहिले जात असे. जपानमध्ये बौद्ध धर्माचा उदय व विकास होण्याआधी चीन व कोरीया या देशांमध्ये बौद्ध धर्म प्रस्थापित झाला.

जगातील इतर कोणत्याही धर्मापेक्षा बुद्धाच्या अभिधम्मास तर्कशुद्ध बुद्धीचा भाग अधिक आहे. केवळ श्रद्धेवर जोपासल्या गेलेल्या लोकांच्या श्रद्धेवर तर्काच्या साह्याने आघात करून बुद्धाने त्याच्या आचार विचारातील दोष घालवून दिलेत त्यांना त्यांचे दुर्गुण सांगून वेळ नष्ट करण्याचा दु:ख मुक्तीचा मार्ग सांगितला तसेच त्यांना समृद्ध जीवन जगण्याचा मार्ग दाखवून दिला. बुद्धाने सांगितलेले अभिधम्माचे तत्वज्ञान पूर्णत: बुदिगम्य, बुद्धीप्रामाण्यवादी, विज्ञाननिष्ठ आहे. मात्र दैनंदिन जीवनातील प्रश्न सोडविताना ते केवळ श्रद्धेने शब्द प्रामाण्याचा अवलंब करून न सोडविता स्वत:च्या निर्णय शक्तीचा वापर करून सोडवावे हे केव्हाही उचित आहे. केवळ परंपरे प्रमाणे न वागता एखादा विचार कितपत संयुक्तीक व हितपद आहे याचा विचार करावा असे बुद्ध म्हणतात.[७]

## जपानमधील बौध्द धर्माचा विकास

भौगोलिकदृष्ट्या जपान भारताचा शेजारी राष्ट्र नाही परंतु धार्मिक दृष्ट्या जापानची संस्कृती भारताशी मिळती जुळती आहे. जापान या देशानी बौध्द धर्माला जीवनाच्या प्रत्येक क्षेत्र, जसे सामाजिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक इत्यादीमध्ये सामिल केले आहे. इलियट यांच्यानुसार ५५२ ई. मध्ये बौध्द धर्म चीन व कोरियाहून जापानपर्यंत पोहोचला. राहुल सांस्कृत्यायन यांच्या मते ५३८ ई. मध्ये दक्षिण कोरियातील कुदारा राज्याच्या राजानी जापानच्या राजाला बौध्द ग्रंथ, बुध्दाची मूर्ती, पूजा साहित्यासोबत एक पत्र पाठविले होते. त्या पत्रात खालील ओळी लिहल्या होत्या:

"हा धर्म सर्व क्षेत्रातील शिक्षणामध्ये उत्तम आहे. या धर्माला समजणे कठीण आहे. चीनच्या मुनींना पण ह्या धर्माला समजण्यात वेळ लागला. या धर्मावर विश्वास ठेवणाऱ्या व्यक्तिला अत्यंत सुखाची अनुभूती होत असून त्यांना बुध्दत्वाची प्राप्ती होते. सर्व इच्छांची पूर्ती करणाऱ्या चिंतामणि रत्नासारखाच हा धर्म मनुष्याच्या सर्व

Scanned with CamScanner

E-ISSN : 2348-7143
July-Sept.- 2021

आशा अभिलाशांची पूर्ती करतो. या धर्माचा प्रसार भारतापासून सुरू झाला असून कोरियापर्यंत पोहोचला आहे. त्याचप्रमाणे शेजारचे सर्व राष्ट्र या धर्माचे अनुयायी झाले आहेत."

या पत्रामुळे जापानमधील जनतेमध्ये बौध्द धर्मासंबंधी जागरूकता निर्माण झाली व थोडया विरोधानंतर जापानमध्ये बौध्द धर्माचा प्रसार सुरू झाला.

राहुल सांस्कृत्यायन यांच्या मते चीनपासून बौध्द धर्म जापान देशात पोहोचला. ५२२ ई. मध्ये सिवा तचिता नावाची एक चीनी बौध्द यात्री चीनच्या पूर्वी तटाकडून जापानमध्ये निर्वासित झाली. जापानची प्रथम बौध्द भिक्खुनी याच वर्षाची होती. सातव्या शतकाचे सर्वश्रेष्ठ चित्रकार देखील याच वर्षाचे होते. पूर्वी जापानी धर्मात पितृ–पूजेचे प्रचलन होते ज्याचे नाव 'सिन्तो' होते. बौध्द धर्मानी या धर्माला देशातून हटविण्याचा प्रयत्न कधीच केला नाही. दोन्हीही धर्म अनेक वृध्द व बोधिसत्वांद्वारे चालविले जाते असे लक्षात येते. पण सातव्या शतकात सिन्तो धर्मातील सर्व विहार बौध्द धर्माला सोपविण्यात आले.

जापानच्या राजदरबारात प्रवेश करण्याकरिता बौध्द धर्माला ३६ वर्षापर्यंत प्रयत्न करावे लागले. सम्राट सुशुन तश्री व त्यांची पत्नी दोन्हीही बौध्द अनुयायी होते. सम्राटद्वारे त्याच्या १९ वर्षीय पुत्र शेतोकला राजकुमार बनविण्यात आले. पण ५९२ ई.मध्ये सम्राटाच्या मृत्युनंतर बौध्द धर्मविरोधी लोकांनी त्याला राज सिंहासनातरून निष्कासित करून त्यांच्या काकु सुई ला राज सिंहासनावर बसविले. बौध्दांच्या विरोधामुळे हे शासन जास्त वेळ टिकू शकले नाही.

५९२ ई. मध्ये राज सिंहासन प्राप्त झाल्यानंतर शोतोक नी बौध्द धर्माला राजधर्म म्हणून घोषित केले. तेन्नोजीचे आश्रम ओसाका इथे स्थापित करून याच्या चारही द्वारांवर बौध्द देवतांची विहारे बनविली. त्याचप्रमाणे शाळा व चिकित्सालयांची स्थापना करून साहित्य, धर्म व दार्शनिक शिक्षणावर भर दिला. शोतोक स्वत: माध्यमिक दर्शनाचे विद्वान होते.

सम्राट शोतोक हे ध्यानी व्यक्ति असून त्यांनी स्वतःच्या हातानी बनविलेली अवलोकितेश्वरची कास्याची मूर्ति 'होर्योजी विहारामध्ये स्थापित केली. ते या विहारामध्ये नित्यनियमाने ध्यान साधना करीत होते. भारतातील बौध्द गयाप्रमाणे या विहाराची मान्यता जापानमध्ये आहे. या विहाराला जापानी राष्ट्रीयतेचे प्रतीक समजल्या जात असून आजही हा विहार जापानी इतिहासाची कार्यशाळा आहे. डॉ. महामरू आन साकी यांच्यानुसार 'शोतोक यांचा ३० वर्षाचे शासन म्हणजे जापानी इतिहासातील अत्यंत युग प्रवर्तक असा काळ आहे'. शोतोक हे जापानी सभ्यतेचे स्थापक व राष्ट्रीय समतेचे निर्माते होते. ६२१ ई मध्ये त्यांचा मृत्यु झाला. व त्यावेळी संपूर्ण जापान देश शोकाकुल झाला.

बुद्धांनी सांगीतलेल्या उपदेशाप्रमाणे एका गोष्टीवर किंवा पूर्वापार चालत असलेल्या गोष्टीवर किंवा लोक काय म्हणतात त्यावर विश्वास ठेवु नका परंपरागत शिक्षण प्रमाण मानू नका किंवा मला एखाद्या भिक्खूला मान द्यावा या इराद्याने त्याच्या मतास मान्यता देऊन त्या मतावर विचार करीत बसू नका मी सांगत आहे म्हणून ते मानू नका परंतु कालमानी एखादी शिक्षण चांगली नाही दोषही आहे ती शहाण्या माणसानी टाकावू ठरविली आहे तिचा अनुसरून ती प्रत्यक्ष कृतीत आणली असता तिच्यापासून नुकसान व दु:ख होते ते तुम्हास माहीत असेल तर तिचा त्याग करण्यास मागे पुढे पाहू नका. यावरून जपानमधील धर्म प्रसारात बौद्ध परंपरेला भगवान बुद्धांनी प्रर्वतीत केलेल्या धर्माला बौद्ध धम्मालाच महत्व देण्यात येते. व या करणानी जगातल्या मोठया धर्मात याची गणना होते.

**प्रथम स्थायी राजधानीची स्थापना**

जपानमध्ये राजाच्या परिनिर्वाणानंतर राजधानी बदलण्यात येत होती. कारण ती अपवित्र झाली असे समजले जात होते. ७०९ ई. मध्ये नाराला स्थायी राजधानी बनविण्यात आले व नविन मठ व विहारांचे निर्माण

E-ISSN : 2348-7143
July-Sept.- 2021

करण्यात आले. ७५२ ई. मध्ये भगवान बुध्दानी धातुनी मूर्ति या नगरामध्ये स्थापित करण्यात आली. ही मूर्ति बसल्या स्थितीमध्ये असून याची ऊंची ५३.५ फुट आहे. या मूर्तिचा चेहरा १६ फुट ९.५ इंच, डोळे ३.९ फुट, कानाचे छिद्र ३ फुट, अंगठा ४.५ फुट, सिंहासन कमल १० फुट उंच तर ६९ फुट त्या परिघामध्ये ही मूर्ती आहे. या मूर्तिच्या निर्माण कार्यात १२२७५ मण पितळ, २२५ मण मेन, १०.५ मण सोन व ६० मण पाराचा वापर करण्यात आला. या मूर्तिला 'दाई बुत्सु' (महाबुध्द) म्हणून संबोधण्यात येते. या मूर्तिच्या प्राण प्रतिष्ठा महोत्सवात भारत, कोरिया, चीन इत्यादि देश सहभागी झाले होते.

७२८ ई. मध्ये गियेन व त्यांचे शिष्य ग्योगी (६७०–७४९) यांनी जापानमध्ये बौध्द धर्माचा प्रचार केला. ग्योगी यांनी ३४ भिक्खु विहार व १५ भिक्खुनी विहारांचे निर्माण केले. जापानमधील सर्वात पहिली जनगणना त्यांनीच केली. ७५४ ई. मध्ये चीनी भिक्खु कंजिन ने 'मरिमा' ची (भिक्खु बनविण्याची शाळा) स्थापना केली. विविध स्थळांवर त्यांनी औषधालय स्थापित केले. त्या काळापासून जापानी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये बौध्द धर्माचा वास झाला.[१०]

निहोन शोकी यांच्यानुसार जापानमध्ये बौध्द धर्माचे पालन ५५२ ई. पासून सुरू झाले. जापानी समाजच्या विकासामध्ये बौध्द धर्माची महत्वपूर्ण भूमिका असून हा त्यांच्या संस्कृतिचा एक प्रभावकारी भाग आहे. आजच्या काळातील जपानमधील बौध्द धर्माच्या शाळा आहेत नीकीरेन पंथ, शिंगोन पंथ व जेन पंथ. २००८ मध्ये प्राप्त तथ्यांनुसार जपानमधील ३४ टक्के जनता बौध्द धर्मीय आहेत ज्याची सुरूवात १९८० पासून झाली. जापानमधील ७५ टक्के जनता बौध्द धर्माचे पालन करते ज्यामध्ये ९० टक्के जनता शिंटो पंथाचा पालन करते. त्याचप्रमाणे ६० टक्के जापानी घरांमध्ये बौध्द मंदिर आहेत.

### जपानमधील बौद्ध तत्वज्ञानाच्या दृष्टिकोनातून सांस्कृतिक संकल्पनांचे स्वरूप

गौतम बुद्धांनी मानवी दु:खाच्या संदर्भात बोलत असताना असे प्रतिपादन केले की, मानवाची तृष्णा किंवा अनियंत्रित आणि अमर्यादित इच्छा मानवाच्या दु:खाला कारणीभूत असते. तृष्णा म्हणजे गरजेचे आसक्तीमध्ये झालेले रूपांतर. ही असक्ती अविद्येमुळे निर्माण होते.

अविद्येचा दु:खनिर्मितीमध्ये जसा महत्वाचा सहभाग असतो, तसाच तो सांस्कृतिक मूल्यांच्या आणि सांस्कृतिक संकल्पनांच्या निर्मितीमध्येही असतो. हा मुद्दा अधिक स्पष्ट करण्यासाठी बौद्ध तत्वज्ञानामध्ये तृष्णेचे आणि अविद्येचे स्वरूप काय सांगितले आहे याचा विचार करू

बौद्ध तत्वज्ञानाच्या तृष्णा ही प्रामुख्याने दोन प्रकारची मानलेली आहे – १) क्लि  ट तृष्णा आणि २) अक्लिष्ट तृष्णा. या तत्वज्ञानामध्ये असे मान्य केले आहे की प्रत्येक व्यक्ती – मग ती स्त्री असो वा पुरूष – राग, लोभ, मोह, आदी अकुशल धर्मांचा आणि अराग, अलोभ आणि अमोह आदी कुशल धर्मांचा संघात आहे. राग, लोभ, मोह, अकुशल धर्मांपासून तृष्णा निर्माण होते. ज्या तृष्णेमुळे व्यक्तीला स्वत:विषयी अशी वाटते त्या तृष्णेला 'क्लिष्ट तृष्णा' असे म्हणतात, तर ज्या तृष्णेमुळे व्यक्तीला बाह्य जगाविषयी आसक्ती वाटते त्या तृष्णेला 'अक्लिष्ट तृष्णा' असे म्हणतात, क्लिष्ट तृष्णा आणि अक्लिष्ट तृष्णा अनुक्रमे क्लिष्ट अविद्या आणि अक्लिष्ट अविद्या यांच्यामुळे निर्माण होतात.

क्लिष्ट अविद्येमुळे स्त्री स्वत:मध्ये नित्य आत्म्याची संकल्पना करते. या अविद्येचा सामाजिक आणि सांस्कृतिक संरचनेशी जवळचा संबंध आहे. या अविद्येचा एक भाग असा की, सांस्कृतिकीकरण आणि सामाजिकीकरण यांचा प्रक्रियेतून स्त्रीला स्वत:ची अशी जी ओळख झालेली असते, ती ओळख आपल्या व्यक्तित्वाचा अविभाज्य आणि अविभाग भाग आहे असे ती समजू लागते. स्वत:विषयीच्या या ज्ञानामुळेच

Scanned with CamScanner

समाजात राहत असताना आपल्यावर अन्याय होत आहे याची जाणीव तिला नसते. याचे उदाहरण आपल्याला थेरीगाथेमधील किसा गौतमीच्या कथेतून मिळते. किसा गौतमीला अनेक वर्षे मूलबाळ नसते म्हणून ती दु:खी असते. ती दु:खी असण्याचे महत्वाचे कारण म्हणजे ती ज्या समाजात राहिलेली असते, वाढलेली असते, त्या समाजाने तिला हे शिकविलेले असते की तू एक स्त्री आहेस आणि मातृत्व हा प्रत्येक स्त्रीचा अनन्यसाधारण धर्म आहे. या संस्काराचा तिच्यावर इतका प्रभाव पडलेला असतो की, मातृत्व नाही म्हणजे आपले स्त्रीत्व जणू काही अधुरेच आहे असे तिला वाटते. त्यातच भर म्हणून तिला मातृत्व नाही म्हणून समाजातील, तिच्या कुटुंबातील व्यक्ती टोचून बोलत असतात.[११] वास्तविक स्त्रीत्व, मातृत्व या सामाजिक संकल्पना आहेत. मातृत्व ही तिची सामाजिक ओळख असेलही. पण त्याच्या आधारे तिला दोषी ठरविणे किंवा स्वत: स्त्रीने तसे समजणे हे अन्यायी आणि अयोग्य आहे. परंतु किसा गौतमीला याविषयी अज्ञान असल्यामुळे आपल्याला मातृत्व नाही या कल्पनेने ती दु:खी होते. अशा तऱ्हेने समाजात राहत असताना स्वत:विषयीच्या अज्ञानामुळे स्वत:विषयी सामाजिक संकल्पना निर्माण होतात.

ज्याप्रमाणे क्लिष्ट अविद्येमुळे व्यक्तीच्या स्वत:विषयीच्या सामाजिक संकल्पना निर्माण होतात, त्याप्रमाणे अक्लिष्ट अविद्येमुळे व्यक्तीच्या बाह्यजगाविषयीच्या संकल्पना निर्माण होतात. या अविद्येच्या संदर्भातही आपल्याला असे म्हणता येते की सांस्कृतिकीकरणाच्या आणि सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेतून स्त्रीला समाजातील अन्य व्यक्तींची ओळख स्त्री, पुरुष अशीच झालेली असते. अशी ओळख होत असताना तिला होणारी बाह्य व्यक्तीच्या संदर्भातील ओळख, जसे की स्त्री, पुरुष आदी, ही त्या व्यक्तीच्या व्यक्तीमत्वाचा अविभाज्य आणि अविभाग घटक आहे, असे ती गृहीत धरते. समाजातील अन्य व्यक्तींविषयी असणाऱ्या या ज्ञानामुळेच समाजात राहत असताना अन्य व्यक्तींनीही सामाजिक नीतिनियम आणि रीतिरिवाज यांच्यानुसार वागले पाहिजे अशी अपेक्षा ती करते किंवा दंडक घालते.[१२]

राहुल सांस्कृतायन यांच्या मते चीनपासून बौध्द धर्म जापान देशात पोहोचला. ५२२ ई. मध्ये सिबा तचिता नावाची एक चीनी बौध्द यात्री चीनच्या पूर्वी तटाकडून जापानमध्ये निर्वासित झाली. जापानची प्रथम बौध्द भिक्खुनी याच वंशाची होत होती. सातव्या शतकाचे सर्वश्रेष्ठ चित्रकार देखील याच वंशाचे होते. पूर्वी जापानी धर्मात पितृ–पूजेचे प्रचलन होते ज्याचे नाव 'सिन्तो' होते. बौध्द धर्मांनी या धर्माला देशातून हटविण्याचा प्रयत्न कधीच केला नाही. दोन्हीही धर्म अनेक बुध्द व बोधिसत्वांद्वारे चालविले जाते असे लक्षात येते. पण सातव्या शतकात सिन्तो धर्मातील सर्व विहार बौध्द धर्माला सोपविण्यात आले.

जापानच्या राजदरबारात प्रवेश करण्याकरिता बौध्द धर्माला ३६ वर्षांपर्यंत प्रयत्न करावे लागले. सम्राट सुशुन तत्री व त्यांची पत्नी दोन्हीही बौध्द अनुयायी होते. सम्राटद्वारे त्याच्या १९ वर्षीय पुत्र शेतोकला राजकुमार बनविण्यात आले. पण ५९२ ई.मध्ये सम्राटाच्या मृत्युनंतर बौध्द धर्मविरोधी लोकांनी त्याला राज सिंहासनावरून निष्कासित करून त्यांच्या काकु सुई ला राज सिंहासनावर बसविले. बौध्दांच्या विरोधामुळे हे शासन जास्त वेळ टिकू शकले नाही.

५९२ ई. मध्ये राज सिंहासन प्राप्त झाल्यानंतर शोतोकनी बौध्द धर्माला राजधर्म म्हणून घोषित केले. तेन्नोजीचे आश्रम ओसाका इथे स्थापित करून याच्या चारही दारांवर बौध्द देवतांची विहारे बनविली. त्याचप्रमाणे शाळा व चिकित्सालयांची स्थापना करून साहित्य, धर्म व दार्शनिक शिक्षणावर भर दिला. शोतोक स्वत: माध्यमिक दर्शनाचे विद्वान होते.

सम्राट शोतोक हे ध्यानी व्यक्ति असुन त्यांनी स्वत:च्या हाताची बनविलेली अवलोकितेश्वरची कास्याची मूर्ति 'होर्योजीच्या' विहारामध्ये स्थापित केली. ते या विहारामध्ये नित्यनियमाने ध्यान साधना करीत होते.

भारतातील बौध्द गयाप्रमाणे या विहाराची मान्यता जापानमध्ये आहे. या विहाराला जापानी राष्ट्रीयतेचे प्रतीक समजल्या जात असून आजही हा विहार जापानी इतिहासाची कार्यशाळा आहे. डॉ. महामरू आन साकी यांच्यानुसार 'शोतोक यांचा ३० वर्षाचे शासन म्हणजे जापानी इतिहासातील अत्यंत युग प्रवर्तक असा काळ आहे'. शोतोक हे जापानी सभ्यतेचे स्थापक व राष्ट्रीय समतेचे निर्माते होते. ६२१ ई मध्ये त्यांचा मृत्यु झाला. व त्यावेळी संपूर्ण जापान देश शोकाकुल झाला.

७२८ ई. मध्ये गिमेन व त्यांचे शिष्य ग्योगी (६७०–७४९) यांनी जापानमध्ये बौध्द धर्माचा प्रचार केला. ग्योगी यांनी ३४ भिक्खु विहार व १५ भिक्खुनी विहारांचे निर्माण केले. जापानमधील सर्वात पहिली जनगणना त्यांनीच केली. ७५४ ई. मध्ये चीनी भिक्खु कजिन ने 'सरिमा' ची (भिक्खु बनविण्याची शाळा) स्थापना केली. विविध स्थळांवर त्यांनी औषधालय स्थापित केले. त्या काळापासून जापानी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये बौध्द धर्माचा वास झाला.[१]

निहोन शोकी यांच्यानुसार जापानमध्ये बौध्द धर्माचे पालन ५५२ ई. पासून सुरू झाले. जापानी समाजाच्या विकासामध्ये बौध्द धर्माची महत्वपूर्ण भूमिका असून हा त्यांच्या संस्कृतिचा एक प्रभावकारी भाग आहे. आजच्या काळातील जापानमधील बौध्द धर्माच्या शाखा आहेत नीचीरेन पंथ, शिंग्टोन पंथ व जेन पंथ. २००८ मध्ये प्राप्त तथ्यांनुसार जापानमधील ३४ टक्के जनता बौध्द धर्मीय आहेत ज्याची सुरूवात १९८० पासून झाली. जापानमधील ७५ टक्के जनता बौध्द धर्माचे पालन करते ज्यामध्ये ९० टक्के जनता शिंटो पंथाचा पालन करते. त्याचप्रमाणे ६० टक्के जापानी घरांमध्ये बौध्द मंदिर आहेत.

६३५ मध्ये लिहण्यात आलेल्या लिआंग या पुस्तकाप्रमाणे कंधार क्षेत्रातील ५ बौध्द भिक्षुक ४६७ ई.वी मध्ये जापानमध्ये आले. जापानचे ऐतिहासिक नाव फुसांग होते म्हणजेच समुद्राच्या पूर्वी क्षेत्रातील पौराणिक राष्ट्र. फुसांग चीनच्या पूर्वी क्षेत्रामध्ये अस्तित्वात होते. पूर्वी फुसांग देशातील लोक बौध्द धर्मापासून अनभिज्ञ होते पण ४६७ ई.वी. च्या दुसऱ्या वर्षी काबुलच्या कंधार या क्षेत्रातील ५ भिक्षुक समुद्री मार्गानी फुसांग येथे आले व बौध्द धर्मासंबंधी ज्ञान व माहिती येथील लोकांना दिली.

असुका काळपूर्वी बौध्द भिक्षु चीनमधून जापान येथे आले व बौध्द धर्माचा प्रचार केला. पश्चिम कोरियाच्या सिओंग नावाच्या राजानी जापानच्या राजा किनमीकडे बौध्द भिक्षुक, बौध्द ग्रंथ व मूर्ती पाठवून बौध्द धर्माचा ज्ञान त्यांना दिला. सुरूवातीला बौध्द धर्माचा प्रसार मध्यम गतीने होत होता पण सुइकीच्या राज्याच्या पुढाकारानंतर जापानी लोक बौध्द धर्मावर विश्वास करू लागले.

५५२ ई.वी मध्ये जापानमध्ये बौध्द धर्माच्या अवशेषांना हटविण्याचा प्रयत्न करण्यात आला. पण जानेवारी १५ ५९३ ई.वी. मध्ये सोगा–नो–उमाको यांच्या आदेशावर असुका–देरा येथील पगोडाची स्थापना करतांनी या बौध्द अवशे ांना तिथे ठेवण्यात आले. यानंतर ६०७ ई.वी मध्ये बौध्द धर्मातील ग्रंथाचे सूत्र सुई चीनला पाठविण्यात आले. बौध्द धर्माच्या वाढत्या प्रसारामुळे सोगो व सोगुचे कार्यालय स्थापित करण्यात आले. ६२७ ई.वी पर्यंत जापानमध्ये ४६ बौध्द विहार, ८१६ बौध्द धर्मगुरू व ५६९ बौध्द भिक्खुनी होत्या.

खिस्तपूर्व ६व्या शतकापर्यंत वैदीक तत्वज्ञान आणि धर्म यातील खरा जोत विझून गेला होता. वैदीक धर्मातील पूर्वीचे पावित्र्य नष्ट झाले होते. मुळ तत्वज्ञानाचा गाभा बाजूला पडून धर्म म्हणजे निरनिराळे यज्ञ आणि समारंभ असे त्याला स्वरूप आले होते. हे यज्ञ इतके खर्चिक असत की ते सामान्य माणसाच्या अवाक्यात राहिलेले नव्हते. सामान्य माणूस या यज्ञाच्या खर्चाच्या ओझ्याखाली दबून गेला होता. धर्माच्या अवनतीबरोबर सामान्य माणसाची ही अवनती झाली होती. सर्व सामान्य लोकांचा कनिष्ठ प्रतिच्या मंत्रावर विश्वास बसला होता. या खुळ्या समजुतीमधून लोकांची फसवणूक होऊ लागली होती त्यामुळे वैचारिक जागृतीची आवश्यकता



Scanned with CamScanner

E-ISSN : 2348-7143
July-Sept.- 2021

निर्माण झाली होती. संपूर्ण जगात एकही सार्वभौम सत्ता अस्तीत्वात राहीली नव्हती त्यामुळे राजकीय व सामाजिक अस्थिरता निर्माण झाली होती. कालावधाने गौतम बुद्धाने आदर्श जीवन त्यांचे व्यक्तीमत्व आणि त्यांच्या तत्वज्ञानावर असणारी त्यांची निष्ठा यामुळेही बौद्ध धर्म उदयास येवू लागला व त्याचा प्रसार व प्रचार जपानसारख्या अती पुर्वेच्या देशातील होऊ लागला होता. या अनुषंगाने गौतम बुद्धाने आपले क्रांतीकारी विचार मांडून समाजे लोकांच्या मनातील भावना बोलून दाखविल्या असेच म्हणावे लागेल.

**संदर्भ सूची:**

१. mr.m. Wikipedia.org
२. http://hdr.undp.org/en/media/HDR_2010_EN_Table.pdf
३. देव प्रभाकर, प्राचीन भारताचा इतिहास, पृ.क्र. ५६
४. डांगे सिंधु, बौद्ध धर्म आणि तत्वज्ञान, पृ.क्र. ३० ते ३३
५. देव प्रभाकर, प्राचीन भारताचा इतिहास, पृ.क्र. ५६
६. सिंह थॉमस, प्रागैतिहासिक से सामंतवादक पृ.क्र. ८
७. आंबेडकर भीमराव रामजी, भगवान बुद्ध आणि त्याचा धम्म अनुवादक, घनश्याम तळवलकर, प्राचार्य, म. भि. चिटणीस पृ.क्र. १७३
८. मनोहर यशवंत, धम्मक्रांतीनी पन्नास वर्ष, पृ.क्र. ५
९. कौशल्यायन आनंद, (अनु) १९५७ अनुत्तरनिकाय, पृ.क्र. १०२
१०. लाल सुमना, प्राचीन भारत मे बौद्ध धर्म प्रचारक, सम्यक प्रकाशन, प्रआ २००९, नई दिल्ली, पृ.क्र. २१३–२१७
११. खरे लता, दिलीप बौद्ध धर्मातील स्त्री विचार, सुगावा प्रकाशन, पुणे द्वि.आ. २००९ पृ.क्र. २६
१२. किता पृ.क्र. २७
१३. आनंद मनीषा, बुद्ध मानस दर्शन, पृ.क्र. ९

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

Oct. To Dec.2021
Issue 40, Vol-09

Date of Publication
01 Dec. 2021

**Editor**
**Dr. Bapu g. Gholap**
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले
-महात्मा ज्योतिबा फुले

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहुभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist.Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

14) A STUDY OF PROSPECTIVE TEACHER'S ATTITUDE TOWARDS COMPUTER IN ...
**Neha Shukla, Lucknow** ||65

15) A study of Attitude of Uttar Pradesh tourists (Resident) Towards ...
**Dr. Ram Ji Singh, Ayodhya** ||68

16) IMPACT OF SOCIAL MEDIA ON MENTAL HEALTH IN SOCIAL WORK COLLEGIATE...
**PROF.DR.SUNIL M. TOTADE, WARDH, MAHARASHTRA, INDIA** ||73

17) CONSUMER PERCEPTION TOWARDS DIGITAL TRANSACTIONS
**Sadaf Bashir, Bodh-Gaya** ||80

18) भगवान बुद्धाचे पाली साहित्यात आर्थिक विचार
**प्रा. प्रणोती कांबळे, नागपूर** ||86

19) 'कालकुंद्री' गावच्या सामाजिक व सांस्कृतिक जडणघडणीत सत्यशोधक ...
**प्रा.डॉ. विष्णू राणबा पाटील, जि. कोल्हापूर** ||89

20) आदिवासी भिल्लांचा इतिहास
**प्रा.डॉ. केशव आत्माराम पावरा, जि. नंदुरबार** ||93

21) प्रेमानंद गज्वींच्या नाटकांमधील आशयसूत्र
**प्रा.महेंद्र किसन सोनवणे & प्रा.डॉ. शिरीष बुधा पाटील, जि. जळगाव** ||96

22) रामटेक नगरपालिकेच्या महसूली खर्च व भांडवली खर्चाचे विश्लेषणात्मक ...
**डॉ. मनोज एम. तेलरांधे, जि. नागपूर** ||101

23) शालेय शिक्षण घेणाऱ्या अनाथलयातील विद्यार्थ्यांची भावनिक बुद्धिमत्ता व त्यांच्या...
**डॉ.बी.आर.शर्मा & प्रदीप एम. बिबटे, नागपूर(महाराष्ट्र)** ||105

24) संस्कृतव्याकरणशास्त्र का क्रमिक विकास
**पंकज शर्मा, धर्मशाला** ||109

25) ज्योतिषशास्त्र में रोग पहिचान के सिद्धान्त
**संजीव कुमार शर्मा, दिल्ली** ||112

26) बौद्ध समाज की सामाजिक समस्या
**डॉ. प्रमिला हरीदास भुजाडे (गणवीर), नागपूर** ||115

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

Scanned with CamScanner

**18**

# भगवान बुद्धाचे पाली साहित्यात आर्थिक विचार

प्रा. प्रणोती कांबळे
पाली–प्राकृत विभाग प्रमुख,
डॉ.म.वा.पी.डब्ल्यू.एस. महाविद्यालय नागपूर

वाड्मयात पालि साहित्याचे महत्व अनन्य साधारण आहे. प्राचिन भारतीय तत्व विचार समाज, संस्कृती, अर्थ, इतिहास भुगोल इ. तथागत भगवान बुध्दानी सम्यक सम्बोधी पालि साहित्याला आधार आहे. पालिसाहित्याची रचना बुध्दकालापासून आजपर्यंत निरंतर होत आहे. तीला दोन भागात विभक्त करता येते. एक पालि त्रिपिटक साहित्य व दुसरे अनुपिटक साहित्य.

शास्ता भ. बुध्दाचा काळ म्हणजे इ.स. पूर्व ६ वे शतक मे इ. स. पूर्व ५ वे शतक त्यावेळी उत्तर भारतात १६ प्रमुख जनपद होते. हे तीन त्यात मगध, कोशल, वत्स त्यात मोठे राज्य होती. कुरु, पांचाळ सुरसेन, काशी, मिथीला, अंग, कलिंग, अश्मक, गंधार आणि कम्बोज ही लहान राज्य होती१.

तथागत धम्मपदात राष्ट्राच्या संदर्भात म्हणतात सेल्लो अयोगुलो भुतो तत्तो अग्गि सिखुपमो मञ्ञ्च भुञ्जेय्य दुस्सीलो रट्ठपिण्ड असञ्ञतो दुराचारी असंयमी होवून देशाचे अन्न खाण्यापेक्षा अग्नीच्या शिखेसमान तप्त लोहाचा गोळा खाणे चांगले आहे.२ म्हणजेच राष्ट्राचे –अन्न फुकट खावू नये हा आर्थिक विचार डोयापुन स्पष्ट होतो.

बुध्द काळातील आर्थिक विचार त्रिपिटक व अनुपिटक साहित्यात अनेक ठिकाणी आढळून येतात. भारतीत अर्थव्यवस्थेचा विचार केल्यास, भारत हा कृषी प्रधान देश आहे. त्या सोबतच कृषी उत्पादनाशी निगडीत व्यापार उद्योगांशी संबंधीत दिसते. कृषी योगाला महत्वाचा पूरक व्यवसाय म्हणजे पशुपालन व दुग्धव्यवसाय कृषी अवजारे, युद्धसाहित्य निर्मिती, वस्त्र, उद्योग इ. चे संदर्भ अनेक सुत्तामध्ये आढळतात. सिद्धार्थ गौतमाचे वडील कपिलवस्तुमध्ये राहत होते. त्यांची स्वतःची शेती होती. त्यामध्ये एक हजार नांगर चालत असत३ यावरुन शेतीचे क्षेत्रफळ किती मोठे होते याची कल्पना येते. अशाच प्रकारचा उल्लेख कसिभारद्वाज सुत्त आलेला आहे. मगध देशातील दक्षिणागिरी प्रांतात एकनाळा नावाचा ब्राह्मण गावात विहार करीत होता. कृषी भारद्वाज ब्राह्मणाच्या शेतात पेरणीच्या वेळी पाचशे नांगर चालू होते. एकं समयं भगवा मगधेसु विहरति दक्खिण गिरिस्मिं एकनाळायं ब्राम्हणगामे । तेन खो पन समयेन कसिभारद्वाजस्स ब्राह्मणस्स पञ्चमत्तानि नङ्गलसतानि युत्तानिहनि वप्पकाले ।४ मूलबीज, स्कन्धबीज फ्ळीबीज, अग्रबीज, बीज बीज, या प्रकारची बीजे व वनस्पती यांचा उल्लेख दिघनिकाय दिसतो५. आज जसे पेरणीच्या वेळी सर्व बीज वनस्पतीचा उपयोग होत असतो. पद्धतीने त्याही काळात उपयोग होत होता.

## पशुपालन जोड व्यवसाय :

भारतात बुद्ध कालीन व आजही शेती बरोबर जोड व्यवसाय, व्यापार दिसून येते. त्याकाळात धनिय गवळी महिनदीच्या किनाऱ्यावर राहत होता. तो म्हणतो माझ्याजवळ गाईची वासरे आहेत. दूध देणाऱ्या गाई आहेत. गाभण्या व फळणाऱ्या तरूण गाई सुद्धा आहेत. गाईचा पुढारी बैल सांड सुद्धा आहे. हे मेघराजा तुझी इच्छा असल्यास खुशाल वर्षाव कर.६ या बरोबरच तो म्हणतो भात शिजला आहे. दूध काढलेले आहे. धम्मपद्यात म्हटले आहे. उदकं हि नयन्ति नेत्तिका, उसुकारा नमयन्ति तेजनं । दारु नमयन्ति तच्छका ।७ अर्थ– पाट काढणारे पाण्याला नेतात बाण करणारे बाणाला वाकवितात, सुतार तासून लाकूड वाकवितात. जोड व्यवसायाच्या संबंधी सामञ्ञफल सुत्त म्हटले आहे. भगवान, महुत घोडेस्वार, सारथी, धनुधर युद्धामध्ये निशान धरणारे, सैन्यातील व्यवस्थापक, मसी सैनिक, मोठ मोठे राजपुत्र हल्ला करणारे, हत्तीसारखे बलवान पुरुष, शूर सैनिक, कातडी आरमार घालून लढणारे दासीपुत्र, आचारी, न्हावी, स्नान घालणारे,

मिळाईकाले मालवकर मोची, केळी, बुरुड, कुंभार, गवळी शिवोलनीय व असेच आणखी अनेक प्रकारचे व्यापार धंदे करणारे लोक, हे माप आयुष्यात आपल्या डोळ्या देखत आपल्या भरभराटीचे (कमाई) फळ उपभोगित स्वतः व माता–पिता, बायका मुलाबाळं व मित्रांना सुख व आनंद देतात. व श्रेष्ठ फळ मिळवते. स्वर्ग प्राप्ती व्हावी, सुख प्राप्त व्हावे व उत्तम स्वर्गाची प्राप्ती व्हावी म्हणून श्रमण व ब्राह्मण यास दक्षिणा देतात.

ज्या प्रमाणे, महाराज, कुशल कुंभार अथवा त्यांचा शिष्य चांगल्या मळलेल्या मातीची ज्या–ज्या प्रकारची भांडी करू इच्छितो, ती ती तयार करीतो, घडवितो ज्या प्रमाणे, महाराज, कुशल दंतकार अथवा त्यांचा शिष्य चांगल्या तयार केलेले दाताचे जे जे प्रकार तयार करू इच्छितो, ते ते तयार करितो, घडवितो ज्या प्रमाणे महाराज, कुशल सोनार अथवा त्याचा शिष्य तापविलेल्या सोन्यापासून जे जे प्रकार करू इच्छितो, ते ते करितो घडवितो.८ या वर्णनावरून हे स्पष्ट होते की, त्याकाळात छोटे–छोटे उद्योग व्यवसाय अस्तित्वात होते.

**सम्माआजीवो सम्यक आजीविकेतून केलेले आर्थिक नियोजन हेच श्रेष्ठ :**

भिक्खुंना, आर्य श्रावक मिथ्या आजीविकेला सोडून सम्यक आजीविकेने आपला चरितार्थ चालवितो ही सम्यक आजीविका आहे.

भिक्खुंनो, या पाच व्यापारापैकी कोणताही व्यापार उपासकांनी करू नये, कोणते पाच शस्त्राचा व्यापार, प्राण्यांचा व्यापार, मासांचा व्यापार, मद्याचा व्यापार आणि विषाचा व्यापार, सम्यक आजीविका म्हणजे उत्तम प्रकारे जीवन निर्वाह चालविणे, तथागतांनी निषिद्ध केलेले पाच व्यापार सोडून दुसरा कोणताही उचित व्यापार उद्योग जीवन चरितार्थ चालविण्यासाठी करता येतो. शस्त्राचा व्यापार प्राण्यांचा व्यापार, मांसाचा व्यापार आणि विषांचा व्यापार निषिद्ध करण्याच्या पाठीमागे लोभापोटी प्राणीहिंसा होवू न देण्याचा उद्देश आहे. प्राणि हिंसेमुळे माणसाच्या मनातील द्वेष वाढतो. त्याच प्रमाणे मद्याचा व्यापारनिषिद्ध करण्याच्या पाठीमागे मद्यामुळे होत असलेल्या अकुशल कर्मांना माणसाने अजिबात टाळण्याचा उद्देश आहे. मद्याच्या प्याल्यापासून सर्व दुर्गुणांची उत्पत्ती होते. माणसाच्या मनातील राग, लोभ, द्वेष आणि मोह नष्ट करण्याच्या दृष्टीने तथागतांनी आर्य अष्टांगिक मार्गाचा शोध लावला आहे.

अर्थविनिश्चयसूत्रात सम्यक आजिविकेची दोन भागात विभागणी केली आहे. १) उपासकांच्यासाठी सम्यक आजीव. २) भिक्खुंच्यासाठी सम्यक आजीव.

सम्यक आजीविका म्हणजे अन्य मार्गाने प्राप्त केलेली उपजीविका टाकून सन्मार्गाने प्राप्त केलेल्या जीविकेवर उपजीविका चालविणे आहे. जगण्यासाठी प्राप्त केलेले धन हे सन्मार्गाने प्राप्त केलेले असावे. अन्य मार्गाने प्राप्त केलेले उपजीविकेचे धन हे हानीकारक असते. बुद्धांच्या धम्मातील खालील मार्गाने प्राप्त धन हे अमान्य आहे. पाच प्रकारचे व्यापार अमान्य करते, शस्त्र व्यापार (सत्थ वणिज्जा), मानव व्यापार (सत्त वणिज्जा), मांस व्यापार (मांस वणिज्जा), मद्य व्यापार (मज्ज वाणिज्ज्या) आणि विषारी द्रव्य व्यापार (विसवाणिज्जा)१०. कुणाल जातकात महा विजित राजाच्या आर्थिक पद्धतीचे स्वरूप स्पष्ट करतांना तथागत म्हणाले –

आपल्या राज्यात शेती करणाऱ्यांना बी–बियाणे देऊन त्यांना शेती करावयाला लावले. तसेच व्यापाऱ्यांना भांडवल देऊन त्यांचा व्यापार वाढविला आणि योग्य मानधनाची निवड करून त्यांनी सरकारी कामावर यथायोग्य मजुरी योजना केली. या उपायाने महाविजिताचे राष्ट्र मोठ्याने धनाने समृद्ध झाले. राज्यातील लोक इतके सुखी झाले की, चोऱ्या, दरोडे नाहीसे होऊन ते आता दरवाजे उघडे टाकून आपल्या मुलांना खेळवित मौजेत आनंदाने राहू लागले.११

अनाथ पिण्डिकाला उद्देशून केलेल्या एका उपदेशात भगवान बुद्ध म्हणतात गृहस्थाने चार प्रकारची सुखे उपभोगावीत १) आर्थिक स्थैर्य, २) भोगसुख म्हणजे कायदेशीर मार्गाने मिळविलेल्या संपत्तीचा व्यवहारी दृष्टीने केलेला व्यापार अनणसुख म्हणजे मी कुणाच्या कर्जात नाही. किंवा माझ्यावर कुणाचे कर्ज नाही. या विचाराने मिळणारे सुख आणि अनवद्यसुख म्हणजे मी शरीराने वाचेने आणि मनाने फक्त कुशल कर्मच केली आहेत. त्यामध्ये मी दोष रहित आहे. या विचारांनी मिळणारे सुख.१२

ज्या प्रकारे संपन्न शेतात बीजरूपी संपती पेरल्यावर आणि वर्षारूपी संपती पडल्यावर धान्यरूपी संपती होत असते. किड्या मकोड्यांनी होणाऱ्या हानीच्या अभावरूपी संपती होत असते. विपूलतारूपी संपदा होत असते. आर्थिक फलरूपी संपदा होत असते. त्या प्रकारे शीलवानांना भोजनरूपी संपतीचे दान दिल्यावर (त्रिविध कुशल) संपतीची प्राप्ती होत असते. कारण की त्यांचे ते कर्म सम्पूर्ण होत असते. म्हणून जी व्यक्ती संपन्न आहे. आणि जी संपदा करण्याची आकांक्षा करीत आहे. त्याने त्या शीलपन्नांची सेवा केल पाहिजे. हीच संपती प्राप्त करण्याची विधी आहे. विद्या तसेच आचरण युक्तश्या फलस्वरूप चित संपती प्राप्त करून तो सम्पूर्ण कर्म करीत असतो. तसेच अर्थरूपी संपदा प्राप्त करत असतो. तो जगाची यथार्थ जाणकारी प्राप्त करून दृष्टीरूपी संपदाला हस्तगत करून आर्यमार्गरूपी संपदेचे अनुसरण करून संपूर्ण चिताने अर्हत्वाला प्राप्त होत असतो. न चित्तमलाचा नाश करून निर्वाण संपतीला प्राप्त करून सर्व दुःखापासून मुक्त होत असतो हिच त्यांची सर्व संपती असते१३

समण गोतम बीज व वनस्पती नाश इजा करण्यापासून अलिप्त राहतो. न एकादाच जेवन करतो. तो रात्री निराहार असतो व अवेळी भोजन करीत नाही तो नृत्य गीत वादन इत्यादी गोष्टीपासून अलिप्त राहतो, तो माला, गन्ध विलेपन नटणे, थर इत्यादीपासून अलिप्त असतो तो उंच किंवा मोठया आसनावर बसत नाही. तो सोन्य कुप्याचे कधीही ग्रहण करीत नाही. न शिजलेले अन्न व मास ग्रहण करीत नाही तो स्त्री कुमारिका यांचा स्विकार करीत नाही. तो दासदासी, बकरा, एडके, कोंबडे, डुकरे हत्ती, गायी, घोडे, घोडव, शेतीवाडी, इत्यादी ग्रहण करीत नाही. तो दूतकर्म, निरोप, पोहचविणे, क्रयविक्रम, खरेदी विक्री व्यवहार वजनमापात दांडी मारणे, खोटी नानी खरी म्हणून फसविणे, लाच, लबाड्या, फसवेगीरी व खोटेपणा हातपाय तोडणे, खून करणे कैद करणे, वाटमाऱ्या दरोडे घालणे इत्यादी कृत्यापासून अलिप्त आहे१४

**सम्राटअशोकाच्या शिलालेखात म्हटले आहे –**

सर्व प्रजा माझी मुले आहेत. ज्या प्रमाणे माझ्या मुलांची भरभराट होऊन त्यांनी ह्या जगात आणि पुढच्या जगात सुख उपभोगावे अशी माझी इच्छा आहे. त्याच प्रमाणे माझ्या प्रजेची भरभराट होऊन त्यांनी ह्या जगात आणि पुढच्या जगात सुख उपभोगावे अशी माझी इच्छा आहे.

जगात सुख समाधान येण्यास मी कारणीभूत व्हावे. माझ्यामुळे जगात सुख यावे. दुःख येऊ नये. सर्व जगात सुख शांती नांदावी यापेक्षा मोठे असे दुसरे कोणते तरी कर्तव्य नाही. सर्व जगाच्या कल्याणासाठी मला झटले पाहिजे१५

भ.बुद्ध म्हणतात राजाने स्वतः धार्मिक आणि सदाचारी असावे. त्याने दुर्गुणांपासून दूर राहून प्रजेला आदर्श घालून द्यावा. भ. बुद्ध म्हणतात जो सर्वामध्ये उत्तम गणला गेला आहे. तोच जर स्वतः दुर्वर्तन करू लागला तर त्याची प्रजा कशी वागेल हे सांगणे जरूर आहे काय ? त्याची प्रजा त्याचेच अनुकरण करेल राजा जर दुर्वर्तनी असेल तर त्याची प्रजा हाल अपेष्टात दुःखात असेल. राजा जर सद्वर्तनी असेल तर त्याच्या सर्व राज्यात सुख नांदेल१६

ह्यावरून लोकांचे आर्थिक जीवन समृद्ध व्हावे हिच भावना तथागताच्या काळातील आर्थिक विचारातून स्पष्ट होते.

भवतु सब्ब मंङ्गलं !

**संदर्भ सूची :**

१. प्राचीन राजवंश और बुद्धधर्म– पृ.क्र. १२८
२. धम्मपद भ. आनंद कौसल्यायन– पृ.क्र. ७२.
३. बुद्ध कथा ले. डॉ. रघुनाथसिंह, हिंदी प्र. स. वाराणसी, पृ. क्र. ७०
४. सुत्तनिपात अनुवादक मुळावा : पृ.क्र. ३८. प्रा.म. एम. सत्यपाल, प्रकाशक भा.बौ.ग्रा.शि.सं.
५. दीघनिकाय १– अनु. प्रा.चि.वै. राजवाडे पृ. क्र. २२. कौशल्य प्रकाशन औरंगाबाद
६. सुत्तनिपात धनिय सुत – पृ.क्र. २० ६.
७. धम्मपद – भ. आनंद कौसल्यायन– पृ.क्र.– ३६
८. दीघनिकाय – अनुवादक चि. वै. राजवाडे, सामञ्ञ फल सुत – पृ.क्र.७८
९. भवान बुद्धाचा मध्यम मार्ग एम.एस. मोरे, पृ.क्र.

१३०

१०. धम्मगंथ आर.ए. खिल्लारे पृ.क्र. ७०-७१ प्रज्ञाकृती सुची प्रकाशन, २०१० औरंगाबाद.

११. भगवान बुद्धाचा मध्यम मार्ग पृ.क्र. १२० एम.एस. मोरे

१२. किता, पृ.क्र. १२१

१३. अंगुत्तर निकाय भाग-५- दान वग्गो सील सुत्त, अनु- एम.एस. मोरे, पृ.क्र. ६६४, प्रज्ञाकृती जाने १९९५

१४. ब्राह्मजाल सुत डॉ. सुळका ओंगरे – मैत्रा प्रकाशन २०१० पृ.क्र. १८, नागपूर, प्रज्ञाकृती

१५. भ. बुद्धाचा मध्यम मार्ग – पृ.क्र. ११२

१६. किता, पृ.क्र. ११२

❑❑❑

19

## 'फालकुंद्री' गावच्या सामाजिक व सांस्कृतिक जडणघडणीत सत्यशोधक चळवळीचे योगदान

प्रा.डॉ. विष्णू दत्तबा पाटील
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,
कोवाड, ता. चंदगड, जि. कोल्हापूर

**प्रस्तावना –**

एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धात स्थापन झालेल्या सत्यशोधक समाजाने सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि धार्मिक क्षेत्रात मूलगामी स्वरूपाचे कार्य केले. खेड्यापाड्यात पोहोचलेली सत्यशोधक चळवळ ही पहिली चळवळ म्हणता येईल. ही चळवळ म्हणजे ग्रामीण भागातील लोकांना शिक्षण आणि ज्ञान देऊन, त्यांच्या ठिकाणी असलेली अज्ञानाची आणि पुर्वग्रहाची जीर्ण वस्त्रे टाकून आधुनिक संस्कृतीचे आणि ज्ञानाचे लेणं त्यांच्यापर्यंत पोहचवणारी एक सामाजिक प्रेरणा ठरली. भारतीय शेतकऱ्यांच्या दु:खाला या समाजाने वाचा फोडण्याचे कार्य केले आणि कामगारांच्या समस्या स्पष्ट केल्या. जोतीरावांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेल्या सत्यशोधक समाजाच्या पुढाऱ्यांनीच भारतीय कामगार चळवळीस प्रारंभ केला. सत्यशोधक समाजाने अस्पृश्यांना आणि पददलीतांना समाजात महत्वाचे स्थान देण्यासाठी प्रयत्न केले. जातीभेद आणि चातुर्वर्ण्य या संस्था यांचे महत्व कमी करण्याचा प्रयत्न करून समाजात समानतेसाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. स्त्री शिक्षण समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी उपयुक्त असल्याचे स्पष्ट केले. भारतीय परंपरेने स्त्रियांना शिक्षणापासून वंचित केले होते. समाजात, शब्दप्रामाण्य, जुने आचार – विचार, जुन्या रुढी, कर्मकांड, ईश्वरीसंकेत, स्वर्ग – नरक इत्यादी कल्पना पसरविणाऱ्या आणि मानवी कर्तृत्व गुलामगिरीच्या बंधनात टाकणाऱ्या भ्रामक